नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुख

फेब्रुवारी १९५१

या अंकांत —

१. प्रभाकर माचवे
२. बाळकृष्ण मुंडी
३. मनोहर सपाटवार
४. द. रा. गोमकाळे
५. वसंत खरखेडकर
६. त्र्यं. म. गोरडे
७. ना. ना. हुइ
संघ वार्ता
इत्यादि इत्यादि

वर्ष ६ वें अंक २ रा

युगवाण

संपादक :

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संस्कृति म्हणजे काय ?

प्र भा क र मा च वे

✲

'We know that good manners, without education, intellect or sensibility to the arts, tends towards mere automatism; that learning without good manners or sensibility is pedantry; that intellectual ability without more human attributes is admirable only in the same way as the brilliance of a child chess prodigy; and that the arts without intellectual context are vanity ......People are always ready to consider themselves persons of culture, on the strength of one proficiency, when they are not only lacking in others, but blind to those they lack.........the person who contributes to culture, however important his contribution may be, is not always a cultured person'.

(T. S. Eliot : Notes toward the Definition of Culcture p. 23)

'संस्कृति' किंवा 'कल्चर' शब्द ऐकतांच एकतर संस्कृतिसंरक्षण मंडळाचा अश्लीलतेविरुद्ध मोर्चा डोळ्यासमोर उभा राहतो, किंवा 'कल्चर्ड' मोती! परंतु खरोखरीच सुसंस्कृत मनुष्य किंवा सुसंकृत राष्ट्र असें जेव्हा आम्ही म्हणतों तेव्हा महाराष्ट्रीय संस्क्राति, गुजराती संस्कृति, कानडी संस्क्राति याहून भिन्न अर्थ कांहीं होत नाही का? ऐतिहासिक दृष्ट्या जेव्हा आम्ही भारतीय संस्कृतीचा विचार करतों तेव्हां मानव संस्कृतिपासून कांहि वेगळा अर्थ असतो काय! संस्क्राति ही मूल्यसापेक्ष आहे काय! म्हणजे साहित्यिकांची, कलावंतांची संस्क्राति वेगळी, कोष्टयांची व नावाड्यांची व घनगरांची वेगळी, असा धंदेवाईक अर्थ बदलतो काय? कीं मनुष्यमात्राची अशी एक सामान्य संस्कृति आहे! किंवा इतर आदर्श कल्पनांप्रमाणे 'संस्कृति' हाहि निव्वळ हवेंतील फुगा आहे!

व्युत्पत्तिशास्त्रदृष्ट्या 'कल्चर' या इंग्रजी शब्दाचे अर्थ आहेत—शेती, वर्धन, उत्पत्ति, वाढविलेले जीवाणु, शिक्षणाने सुधारणा, (मानसिक किंवा शारीरिक); मानसिक विकास. याच अर्थाला अनुलक्षून रविंद्रनाथ टागोरांनी बंगालांत सृष्टि प्रमाणे 'कृषि' शब्द रूढ केला. मॅथ्यु आरनॉल्डने म्हटलें आहे— Culture is to know the best that has been said & thought in the world. (जगांतील सर्वोत्तम कथन व चिंतन जाणणें, म्हणजे संस्क्राति) परंतु 'ऋते ज्ञानान्न मुक्तिः' बरोबरच 'नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुधा श्रुतेन'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'संस्कार'चे चौदा अर्थ संस्कृति कोशांत आहेत--१ चांगल्या रीतीने रचणें, मांडणें २ सुधारणें, स्वच्छ करणें, मुलामा देणें, ३ अलंकरण, मंडण, ४ शिक्षण, ५ शुद्धीचा विधि, ६ उत्सव, ७ मुंज, ८ कोणत्याहि वस्तूला पूत बनाविणें, ९ मृत्युनंतरच्या क्रिया, १० (औषधी किंवा स्वयंपाक) सिद्धि, ११ सांचा, ठसा, बिंब. १२ वैशेषिक दर्शनांतील तीन स्वयंभू गुण, भावना, वेग आणि स्थितिस्थापकता, १३ अनुबोध, अनुज्ञान, १४ निश्चय, निर्धार इत्यादि.

पण Jules de Gaultier च्या Comment naissent les Dogmes च्या लेखावर लिहीत असतांना हॅवेलॉक एलिस आपल्या 'The Philosophy of conflict' या निबंधांत म्हणतो— " So that militarist and pacifist play into each others hands like two accomplished jugglers, adroitly changing the ball they play with to the bewilderment of the spectator ". संस्कृतिची खरी परीक्षा संघर्षकाळांत होते. उलट शांततेच्या पूर्वपीठिकेवाचून कोणत्याहि देशाची 'सभ्यता' (हिंदींत 'संस्कृति' च्या अर्थी शब्द; 'तहजीब और तमद्दुन' उर्दू शब्द) नीट वाढूं शकत नाही. इतिहासांतील सर्व स्वर्णयुगें शांततेच्या वातावरणांतच वाढलीं.

शांति व युद्ध ही केवळ बाह्य परिस्थिति नसून तिचे मानसिक पर्यायहि आहेतच. चिडलेला, निराश, चारीकडून बांधलेला, जखडलेला व वाढ खुंटलेला मनुष्य संस्कृतीबद्दल ती भव्य व विराट कल्पना मनांत रेखाटूंच शकत नाही, जी एक समत्व-योगाचें मानसिक आरोग्य जाणणारा माणूस सहज मूर्त करूं शकेल. परंतु मनुष्याचें मन हेंच प्रमाण मानलें तर अहंकार, मद, लोभ, स्वच्छंदता इत्यादि प्रवृत्तींचे व विकारांचे रंग संस्कृतीच्या घटनेंत मिसळतील व विवेकाचा संस्कृतीशी काय संबंध आहे हा प्रश्न उभा राहील ? फ्रॉइड म्हणतो त्याप्रमाणे समाजांतील नैतिक मूल्यें निव्वळ 'टॅबू' किंवा भेडसावणारीं बुजगावणींच आहेत काय ? समाजनीति व वैयक्तिक नीतीच्या संघर्षांतून नेहमी थोर महात्मे, विभूति जगदुद्धारक, संत, सेनानी व साहित्य-कला-मनीषी निर्माण झाले आहेत असें आढळतें. पण सामाजिक निर्बंध केवळ उल्लूपणानें झुगारणारे अपराधी व गुन्हेगार देखील या कोटींत येतात काय ! प्रतिभावंत व गुन्हेगार या दोघांमध्ये जो विलक्षण निर्धार व जी इच्छाशक्तीची प्रखर धार दिसून येते, त्यामुळे समाजाचें कल्याण अकल्याण दोन्हीहि संभवतें. संस्कृतीचा विचार करतांना या अतिमानवांचा व अपमानवांचा विचार करायला हवा.

हल्ली सर्वत्र असे पडसाद ऐकूं येतात की एकूण जागतिक संस्कृतीच अधोगतीस लागली आहे व तिचा ऱ्हास होत आहे. हें विकृत (डिकेडेंट) युग आहे. पण रानांत झाडांखाली पालापाचोळा कितीहि सडत राहिला तरी त्या महावृक्षांची वाढ व उंची कमी होत नाही. एक जुनें जग खंडित होऊन पडलें आहे. त्या पडलेल्या-पाडलेल्या इमारतींचे ध्वंसावशेष सर्वत्र दिसताहेत. विटा-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाव्यी
६५ १

चुन्याच्या त्या ढिगाजवळच नव्या जगाची पायारोवणी चालू आहे. हें नवें बांधकाम कोणत्या नमुन्यावर होणार ? गांधीजी जें स्वप्न पाहात होते त्या ग्राम–केंद्रित, हस्तशिल्पावर आधारलेली अल्पसंतुष्ट परिवारप्रधान संस्कृतीची निर्मिती होणार की शिकागोचे इमले, हॉलिवुडचा झगझगाट आणि वाशिंगटनच्या विधान-भवनाची कार्बनकॉपी येथे आम्ही उमटविणार की कांही लोक मनांत विचार करतात तसे मॉस्कोचे क्रेमलिन राजवाडे, लेनिनग्रामचे संस्कृति–उद्यान, उक्राइनची समूह-शेती व निप्रोपेट्रोलस्क सारखे बंधारे येथे उभारले जाणार ? आणि हा प्रश्न केवळ आमच्या देशापुढे, मूठभर राजकारणी पुरुषांपुढे, विचार करणाऱ्या लेखक कलावंतापुढेच नव्हे तर हें जगापुढे उभें असलेलें प्रश्नचिन्ह आहे. आगामी संस्कृति परमाणु-बॉम्बची संस्कृति होणार की अहिंसक मानवाची संस्कृति होणार ? कामगारांची हुकुमशाही तिला मंजूर आहे की कांही निवडक धनकोंनी राबवलेली लोकशाही !

मानसशास्त्रदृष्ट्या आम्हांला निरोग मन असलेला सुसंस्कृत मनुष्य हवा आहे. म्हणजे त्याचें मन बाहुलीप्रमाणे, हिंदुत्व, संघसंचालक, स्तालिन, जयहिंद, असले घोष ऐकल्याबरोबर रॉबॉट किंवा ऑटोमेटॉनप्रमाणे विशिष्ट हातवारे, क्रियाकलाप करूं लागणारें यांत्रिक मन नको आहे. मनुष्याच्या मनाचें कांहीहि करतां येईल, पण त्याचे निर्जीव ठोकळे बनविण्याचा प्रयत्न आजपावेतो सपशेल फसला आहे. मनुष्याला स्वतंत्र विचार–भावना–संकल्प आहेत, हें म्हणतांच आमचें सैन्यानुशासननिबद्ध शिस्तबाज ओरडतील–अराजक ! अराजक ! ! संस्कृति म्हणजे वक्तशीरपणा, शिस्त, आज्ञाधारकत्व वगैरे आलेंच. परंतु ‘ एकमेकां साह्य करूं अवघे धरूं सुपंथ ’ आणि ‘ जो का रंजला गांजला । त्यासी म्हणे जो आपुला ’ असले साधु आचरण ठेवणें, कारुण्य, जगद्बंधुत्व, मैत्री व सहिष्णुता असणें याचा अर्थ भोंगळपणा, गैरशिस्तपणा, भेकडपणा नव्हे.

संस्कृति स्वातंत्र्यांत वाढते हें मानसशास्त्रीय सत्य मानल्यानंतर समाजशास्त्र-दृष्ट्या स्वातंत्र्याची सापेक्ष व्याख्या लक्षांत घ्यायला हवी. एका दृष्टीने आज जें स्वातंत्र्य आहे तें कांही दिवसांनी दास्यत्वांत परिणत होतें. ॲल्डस हक्स्लेच्या एका कादंबरींतील पात्र एंथनी म्हणतो–– For in his successive attempts to realise the Idea of Freedom, man is constantly changing one form of slavery to another the primal slavery is the slavery to the empty belly and the unpropitious season. Slavery to nature, in a word...........Abolish slavery to nature. Another form of slavery instantly arises. Slavery to institutions : religions, economic, legal, military, educational, artistic and scientific institutions (p. 161-162 : Eyeless in Gaza : Aldous Huxley)

आज आमच्या समाजमनाभोंवती अशाच अनेकानेक रूढींची वलयें उत्पन्न झालीं आहेत. तेव्हा नित्शे सारखे कांही बंडखोर विचारक व शेले,

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बायरन, गडकरी, बी या सारखे कांही कवी एकदम वातचक्राचें आवाहन करतात व तुतारी फुंकून डंका पिटतात. परंतु जगांत विप्लवानेहि संस्कृतीचा प्रश्न पूर्णपणे सोडवला जाऊं शकत नाही. ज्याप्रमाणे डी. एच. लॉरेन्स आपल्या 'Books' निबंधांत म्हणतो—" निव्वळ बंडाने माणसाचें कांहीच भलें झालें नाही. मनुष्यांच्या आत्म्यांतील जिवंत साहसमय स्फुलिंगच शेवटी उपयोगी ठरतो... जर अशा महोत्सवाने आम्ही जितके अपमानव झालों आहोंत त्याहूनहि अधिक अमानवी होणार असलों तर अशा उलथापालथींचा, अशा विप्लवाचा कांहीच अर्थ नाही. "

संस्कृतीचा व शांततेचा आणि स्वातंत्र्याचा असा संबंध आहे. सुसंस्कृत मनुष्य शांत असतो म्हणजे तो नेभळट नसतो. सुसंस्कृत राष्ट्र शांतताप्रिय असतें म्हणजे ते निर्वीर्य नसतें. सुसंस्कृत मनुष्य स्वतंत्रबुद्धीने चालतो म्हणजे तो शब्द-प्रामाण्याची रूढि मानत नाही. सुसंस्कृत राष्ट्र मुक्त मनाने वागतें म्हणजे त्याच्या ठायी कोणतीच साम्राज्यशाही, वसाहतशाहीची विजिगीषा नसते.

संस्कृतीच्या आरंभाचा इतिहास पाहतां मानववंशशास्त्रज्ञ टायलट इत्यादि उत्सवांचें, ललितकलांचें, वैद्यकीचें, ज्योतिषाचें मूळ उपयुक्ततावादांत व भय-आरक्षा इत्यादि मानवी प्रवृत्तींत सांगतात. जादूटोण्याच्या मंत्रांतून आजची आमची नाखवा गीतें व भावगीतें उत्क्रांत झालींत असें कुणी म्हणालें तर त्यावर सहसा विश्वास बसणार नाही. परंतु ही गोष्ट खरी आहे. संस्कृतीचें मूळ असंस्कृतांच्या जमातींतून वसणाऱ्या अंधविश्वासांत व असत्याच गोष्टींतून आढळतें. जगदलपुर वगैरे बस्तर प्रदेशांतील माडिया लोकांच्या शवसंस्काराचें वर्णन फादर एलविनने केलें आहे. त्यांच्या मनांत असलेले मृताबद्दल आदर व भीतीचे भाव आज देखील सुसंस्कृत मनुष्यांत कमी अधिक प्रमाणांत आहेतच. पाकशास्त्राचें उदाहरण घ्या. आरंभी शिकार करून कच्चें किंवा अग्नीवर भाजलेलें मांस खाणाऱ्या आदिम मनुष्यांत व हल्ली निरनिराळ्या प्रकारच्या देशीविदेशी पक्वान्नांचा समाचार घेणाऱ्या सुसंस्कृत माणसांत रुचिभेद हा होत गेलेला आहे. अस्वादवृत्ती लोकांच्या मते हा रुचि-विकास विकृत असेल किंवा वाईटहि असेल. परंतु ती एक ऐतिहासिक घटना आहे हें नाकबूल कसें करतां येईल ? आतां परत शाका-हाराकडे किंवा मांसाहाराकडे नाइलाजामुळे जगांतील कांही देश व प्रांत वळत आहेत ही गोष्ट निराळी; परंतु संस्कृतीच्या विकासाच्या दृष्टीने आजचा सुधारलेला मनुष्य खरोखरीच वन्य आदिमानवापेक्षा नीतिमत्तेंत सुधारलेला आहे असें निश्चित म्हणतां येणार नाही. नीतिमूल्येंहि बदलत गेलीं आहेत.

याच दृष्टीने कलावंतांचे शील व कलेची संस्कृति यावर विचार करायला हवा. कांही लोकांच्या मते सौंदर्यशास्त्राचा संस्कृतिमूल्याशी निकट संबंध आहे. वस्तुतः सौंदर्याबद्दल अभिरुचि संस्कृति मोजण्याचे एक प्रमुख साधन आहे. कांही लोकांची आवडनिवड स्थानबद्ध असते. वर्ड्स्वर्थला पत्र लिहितांना चार्ल्स लँबने My attachments are all local ' म्हटलें किंवा ' Dissertation on

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

a Roasted Pig' लिहितांना ज्याप्रमाणे सहस्मृतींची आमण त्याच्या मनाच्या सराईत उतरते, तद्वत इतर लेखकांच्या किंवा कलावंतांच्या आवडीनिवडी त्यांच्या व्यक्तिरवाच्या केंद्रांतून जरी निघत असल्या व त्यामुळे त्यांना आपल्या मूळ मातीचा वास जरी बराच लागलेला असला, तरी तो लेखक किंवा कलावंत सामाजिक असल्यामुळे त्याच्या या रसप्रक्रियेंत सामान्यीकरण किंवा साधारणीकरण हें होतेंच. अन्यथा त्याचे विचार व त्याच्या भावना फारच मर्यादित स्वरूपाच्या आणि सर्वांना आकलनीय अशा राहणार नाहीत.

सौंदर्य हें निरपेक्ष मूल्य असलें तरी ज्या देश-काल-परिस्थितींतून तें उद्‌भवतें, ती परिस्थिति अगदींच विचारांत न घेण्याजोगी असते असें म्हणता येणार नाही. प्रत्येक प्रांत, देश, मानवसमूह व समाजघटक यांच्या संस्कृतिबद्दल कल्पना वेगळ्या असल्या तरी सर्वसामान्य मानवी संस्कृति किंवा जागतिक संस्कृति अशी एक वस्तु आहेच व तिचें शिक्षण मनुष्यास योग्य रीत्या दिलें गेलें तर त्याची सौंदर्यदृष्टि देखील विकृत होणार नाही अशी अपेक्षा आहे.

वस्तुतः ज्या प्रमाणे धर्मातीत मानव ही नवी शास्त्रीय धारणा आहे त्याचप्रमाणे खरी शास्त्रातीत संस्कृति ही देखील भावी जगाची आवश्यकता आहे. भौतिक शास्त्रांची अणुबाँब पावेतो प्रगति झाल्यानंतरहि इशावास्योपनिषदकार म्हणत तद्वत् 'अंध तमः प्रविशंति ये संभूतीमुपासते!' ची वाळूच हातीं उरते, तरी या पलीकडेहि मानवी सुख आणि शांतीचे अधिष्ठान कुठेतरी आहे तें शोधावें लागेल. ज्याप्रमाणे खरें शिक्षण हें युनिव्हर्सिटया व शाळांतून मिळत नसून त्यांतून मिळालेले सर्व धडे विशाल, अनुभवांच्या, जीवनांच्या धकाधकींत तावून सुलावून जें उरतें तेच खरे शिक्षण तद्वत मानवी संकल्पशक्ति व इतिहासाच्या संघर्षातून उत्तरोत्तर अधिक बुद्धिवादी व भावनाप्रवण अशा खऱ्या संस्कृतीचीं नवीं क्षितिजें निर्मित होत असतात. भारतीय संस्कृति केवळ मूठभर सवर्ण किंवा अमुक छापाच्या व पंथाच्या माणसांची मिरासदारी नाही. मानवी संस्कृति ही कोणत्याहि एक देशीय संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ आहे.

'भारतीय संस्कृति' ग्रंथाच्या प्रस्तावनेत साने गुरुजींनी लिहिलें आहे— 'भारतीय संस्कृति म्हणजे सहानुभूति. भारतीय संस्कृति म्हणजे विशालता. भारतीय संस्कृति म्हणजे सत्याचे प्रयोग. भारतीय संस्कृति म्हणजे स्थाणु न राहतां सारखें ज्ञानाचा मागोसा घेत पुढें जाणें. जगांत जें जें कांही सुंदर, शिव व सत्य दिसेल तें तें घेऊन वाढणारी ही संस्कृति आहे. भारतीय संस्कृति संग्राहक आहे. ती सर्वांना जवळ घेणारी आहे. "सर्वेषामविरोधेन ब्रह्मकर्म समारभे" भारतीय संस्कृति म्हणताच सागर व अंबर या दोन महान वस्तु माझ्यासमोर उभ्या राहतात. प्रकाश व कमळ या दोन दिव्य वस्तु डोळ्यासमोर उभ्या राहतात. भारतीय संस्कृति म्हणजे संसारांतून अनंताकडे जाणें, भेदांतून अभेदाकडे, विरोधांतून विवेकाकडे जाणें."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भक्त नामदेव

बाळकृष्ण मुंडी

संत साहित्याचें अध्ययन करीत असतां एक विशेष गोष्ट प्रत्ययास येते. अभ्यासकांचें लक्ष ज्या प्रमाणांत ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास यांच्या साहित्य आणि कार्याकडे वेधून त्यांच्या संबंधी जितकें साहित्य आजवर निर्माण झालें आहे, त्या मानानें या संतांच्या कार्यकर्तृत्वाला साह्य करणाऱ्या इतर संतांच्या कामगिरीकडे व साहित्याकडे फारसें लक्ष पुरविलें गेलेलें नाहीं. ज्या इमारतीचा पाया ज्ञानेश्वरांनी ठेविला आणि ज्या देवालयावर कळस ठेवण्याचें कार्य तुकारामांनी केलें तें देवालय निर्माण करण्यासाठी ज्या कामगार–कारागिरांनी आपलें जविन दिलें त्यांच्या कार्याचें यथायोग्य मूल्यमापन अद्याप झालेलें दिसत नाही उदाहरणार्थ, या देवालयाचा " विस्तार " करण्याचें खरें कार्य ज्या नामदेवांनी केलें त्यांच्या संबंधी आवश्यक तें अध्ययन–अध्यापन झालेलें नाहीं. या विधानाचें प्रत्यंतर, नामदेव विषयक मराठी साहित्याकडे पाहिलें असतां सहजी येण्यासारखें आहे. " सर्व प्रकारें संशोधित,' असा नामदेवाचा गाथाच नाहीं. येथपासून प्रारंभ करावा लागेल. त्यानंतरहि त्यांच्यासंबंधी निर्माण झालेलें साहित्य इतकें अल्प, त्रोटक व वरवरचें आहे की त्यावरून नामदेवाच्या कार्य कर्तृत्वाच्या तुलनेने पाहतां तें असून नसल्यासारखेंच वाटतें. श्री भावे व श्री पांगारकर किंवा इतर मराठी साहित्येतिहास लेखकांनी नामदेवाची ओळखण एकतर संतमंडळांत तरी केली आहे किंवा स्वतंत्र प्रकरणांच्या द्वारें विवेचन केलेलें असलें तरी त्यांत फारशी चिकित्सक पद्धति स्वीकारलेली नाही. ह. भ. प. पांगारकर, श्री भावे, किंवा अगदी अलीकडेच प्रकाशित झालेले रा. तुळपुळे याचें " पांच संत कवि " मधील नामदेव विषयक प्रकरण पाहिलें तरी जी एक गोष्ट स्पष्टपणे दिसून येते ती ही की नामदेवांच्या थोड्याशा उपलब्ध अभंगाच्या समालोचनापलीकडे जाऊन त्यांच्या अभंगांच्या प्रामाण्याची, त्यांत व्यक्त होणाऱ्या तत्वज्ञानाची, ज्ञानेश्वरांच्या कर्तृत्वाच्या तुलनेने नामदेवांच्या कर्तृत्वाची, त्यांच्या पंजाबांतलि कार्याची तसेंच त्यांच्या हिंदी पदांची, उत्तर भारतीय विचारसरणीवर पडलेल्या प्रभावाची कोणीहि फारशी दखल घेतलेली नाही. रा. भाव्यांनी " पंजाब "बद्दल मौनच स्वीकारलें आहे तर रा. पांगारकरांनी फारच त्रोटक विवेचन करून आपलें प्रकरण केवळ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एका पदाच्या आधारावर सजविलें आहे. रा. तुळपुळे यांनी तर पंजाबांतील नामदेवाची ओळखण दीड दोन पानांतच केली आहे. रा. श. पु. जोशी यांनी "पंजाबांतील नामदेवा"ची माहिती देण्याचा प्रयत्न बराच यशस्वीपणे केला असला तरी त्या पुस्तकाचें स्वरूप संकलनात्मकच आहे. त्यांत चिकित्सकपणा तितकासा नाही. किंबहुना तसली दृष्टि ठेवून रा. जोशी यांनी वस्तुतः कार्य केलेलें नाहीच. मिळेल ती साधन-सामग्री एकत्र करून अभ्यासकापुढें ठेवणें एवढेंच मर्यादित असें त्यांचं कार्य ठरतें आणखी कांही वर्षे ते राहिले असते तर कदाचित् या दृष्टीने त्यांनी कांही कार्य केलेंहि असतें. प्रा. बापट "नामदेव" विषयक संशोधन करण्याची भाषा अनेकदां बोलत असल्याचें प्रस्तुत लेखकाला माहीत आहे. परंतु त्यांच्या अकाली मृत्यूनें तें सर्व तसेंच राहिलें आहे.

सारांश ही अशी एकंदर स्थिति आहे, आणि जेथे "नामदेवा"सारख्या भक्तराजाची ही स्थिति आहे, तेथे अन्यान्य संत मंडळी बद्दल तर बोलण्याचें कारणच नाही. तेव्हां सांगण्याचा मतितार्थ एवढाच की ज्ञानेश्वरादि प्रमाणेच या इतर संतांनीहि तितकीच मोलाची व प्रसंगी अप्रतिम अशी कामगिरी केली आहे. नामदेवांनी तर आपलें सगळें उत्तरआयुष्य याच कार्यांत समर्पित केलें व सतत परिश्रम, चिकाटी व आपल्या स्वीकृत कार्याबद्दलची असीम निष्ठा व श्रद्धा तसाच दृढ आत्मविश्वास बाळगून "भक्तीचा" पताका, मराठ्यांचा "जयिष्णु" जरी-पटका अटकेवर रोवला जाण्याच्या तीनशे वर्षे पूर्वीच, अटकेपार रोविला. "महाराष्ट्र धर्मा"चा प्रचार प्रसार करून आपल्या प्रभावी तत्त्वज्ञानाने तत्प्रदेशाच, तत्कालीन आणि पश्चात्वर्ति विचारकांच्या व संतांच्या मनावर संस्कार घडविले. हें सगळें अद्वितीय आहे. या सगळ्याचें यथायोग्य मूल्यमापन होणें अत्यावश्यक आहे. परकीय आक्रमणाच्या "राष्ट्रीय" संकटाच्या वेळी विशुद्ध "भारतीय" दृष्टिकोण ठेवून* मराठे अब्दालीशी झुंजले ते पुढें तीन चार शतकानंतर, परंतु परकीयांच्या राजकीय आक्रमणाबरोबरच ओढवलेल्या व त्यापेक्षाहि भयंकर धार्मिक व सांस्कृतिक संकटाचा परिहार करण्यासाठी निकराचा पण सहिष्णु संघर्ष करण्या-साठी सर्वसामान्यांची मनोभूमिका तयार करण्याचें एवढेंच नव्हे तर त्या कार्यांत पूर्णपणे यश मिळवून त्यांच्याकडून झुंज घेवविण्याचेंहि महनीय "राष्ट्रीय" कार्य नामदेवांनी त्याच्या तीनशे वर्षे अगोदरच केलेलें होतें. हा सगळा इतिहास अत्यंत उज्वळ आहे, अभिमानास्पद आहे आणि म्हणूनच अभ्यसनीयच नव्हे तर संतांच्या "राष्ट्रीय" कामगिरीच्या स्वरूपाचें यथातथ्य विशदीकरण करण्याच्या दृष्टीने अपरिहार्यहि आहे. तें कार्य अद्याप झालेलें नाही. ज्ञानेश्वरादिकांच्या बरोबरच या अन्य कार्यकर्त्यांचाहि विचार होणें आवश्यक आहे. कारण त्या शिवाय यासंबंधी केलले विवेचन अथवा इतिहास अपूर्णच राहणार आहे.

ज्ञानेश्वर आणि नामदेव

ज्ञानेश्वर आणि नामदेव यांचे परस्पर संबंध कशा प्रकारचे होते याचें विवेचन ज्ञानेश्वरासंबंधी लिहिल्या गेलेल्या साहित्यांत केलेलें आहेच. या दोघांच्या

* They (Marathas) fought in the cause of *India for Indians* (in the battle of Panipat) —Major Evans Bell.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एकाच कार्यासाठी झालेल्या सहकार्याचे गोडवे व रसभरीत वर्णन; त्यांच्या भेटीचा, त्यांनी केलेल्या तीर्थयात्रेचा, मावंदयाचा; आणि अन्य प्रसंगांचा " सोहळा " पुष्कळच वर्णन केलेला आढळतो; त्यांच्यांत परस्पर पूरक अशा ज्या अनेक गोष्टी होत्या त्याचेंहि दिग्दर्शन पुष्कळ केलें गेलें आहे. परंतु या पलीकडे जाऊन त्यांच्यातील मौलिकतेचें, स्वयंतेचें, भिन्नत्वाचे असे जे इतर पैलु असणें स्वाभाविक आहे त्यांचा फारसा उल्लेख नाही. नाही म्हणावयास नवीनतम प्रगतिशील विचारसरणीचे वारे प्यालेल्यांनी मात्र कांही अंशी तर्कशुद्ध व प्रमाणाधिष्ठित परंतु अधिकांश व अनेक जागी ओढून ताणून या दोघांच्या कार्यासंबंधी " नवीन अर्थ " लावण्याचे प्रयत्न केलेले दिसतात. निश्चित व अंतिम निर्णयाकडे नेण्याच्या दृष्टीने या सगळया अर्थांची व प्रकारांची आवश्यकता कोण नाकबूल करील ! या वादळांतूनच निर्मळ, शांत, पवित्र वातावरणाची अपेक्षा अप्रस्तुत व असंगत ठरणार नाही. नामदेवासंबंधी बोलतांना त्यांच्या ज्ञानेश्वरांबरोबर झालेल्या सहकार्याचे अथवा भिन्नतेचें जितकें महत्व आहे, तितकेंच नामदेवांनी दाक्षिणेतील लोण उत्तरेंत पोहोंचविण्याचें जें स्वतंत्र कार्य केलें आहे तेंहि कांही कमी महत्वाचें नाही. ज्ञानेश्वरांशी त्या कार्याचा " तितकासा " संबंध नाही. यासंबंधी विस्तृत विचार प्रस्तुत लहानशा लेखांत शक्य नाही. एकाच वाक्यांत या संबंधी लिहावयाचें झालें तर असें म्हणावें लागेल की ज्ञानेश्वर आणि नामदेव यांच्या विचारसरणींतच मुलभूत भेद होता, आणि हा मतभेद नाहीसा होण्याच्या दृष्टीने त्या दोघांनाहि विचारांची पुष्कळच " घेवाण देवाण " व " घर–सोड " करून समन्वय करावा लागला आहे. हा समन्वय झाल्यानंतरच इतिहासप्रसिद्ध संतांच्या " प्रचंड चळवळी "चा खऱ्या अर्थी प्रारंभ झाला. ज्ञानेश्वर मूळचे परंपरागत योगमार्गी, निर्गुण पंथी, पूर्वापार चालत आलेल्या " व्यवस्था " अनिष्ट वाटत असूनहि त्याचा त्याग करण्याच्या ऐवजी त्यांना कायम ठेवून अथवा आवश्यक तसें परिवर्तन करीत पुढे जाण्याची विचारसरणी ठेवणारे, ज्ञानोत्तर भक्तिमार्गी, वर्णाश्रम धर्माचा त्याग न करतां पालन करणारे; नियमांच्या, मग ते अनिष्ट, जाचक, अनावश्यक कां होत ना, पण त्यांच्या विरुद्ध न जाता शक्य तो त्यांच्या कक्षेत राहूनच कार्य करूं इच्छिणारे; कांहींच्या मतानुसार " ब्राह्मण " प्रवृत्तीचे अनुसरण करणारे दिसतात. नामदेव वस्तुतः आर्त भक्त. त्यांना ज्ञानेश्वरांशी संबंध येण्याचें कारण म्हणजे केवळ त्यांची निस्सीम " भक्ति. " आपल्या "भक्ति प्रेमा"च्या भांडवलावर त्यांनी प्रत्यक्ष परमेश्वराला देखील आकर्षित केलें होतें, भुलवून वेडे केलें होतें, त्यांच्या सहवासासाठी देव सदैव हपापलेला असे, किंबहुना त्यांचा वियोग क्षणमात्रहि सहन होत नसे. ज्ञानेश्वरांचा व नामदेवांचा कदाचित कधी संबंध आलाहि नसता परंतु नामदेवांच्या भक्त म्हणून प्रसृत झालेल्या कीर्तीमुळे त्यांच्याविषयी ज्ञानेश्वरांना जिज्ञासा उत्पन्न झाली. त्यांच्या एकंदर प्रवृत्तीविषयी माहिती झाल्यानंतर त्यांना आपल्या पंथांत ओढण्याच्या दृष्टीनेहि भरपूर प्रयत्न झालेले स्पष्ट

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहेत. शेवटी ज्ञानेश्वरांना व नामदेवांना आपापल्या विचारप्रवृत्तींचें "आदान-प्रदान" करून समन्वित असा एक "सामान्य मार्ग" निश्चित करावा लागला. स्त्रीशूद्रांना वेदाधिकार प्राप्त करवून देण्याचा प्रश्न सोडला तर ज्ञानेश्वरांना नामदेवापासून पुष्कळ घ्यावें लागलें. उदा० तीर्थ यात्रांचें व हृदय-पक्ष-विहीन अशा अंतर-साधनेच्या व्यक्तिगत व रूक्ष "योगमार्गा"चें वैयर्थ्य, निर्गुणाबरोबर सगुणाचीहि अपरिहार्यता, अद्वैताबरोबर द्वैताची ही आवश्यकता; इत्यादि. नामदेव साधे भोळे बालभागवत, भक्तीचेंच सामर्थ्य जवळ असणारे आर्त व नैष्ठिक भक्त. त्यांच्या सगुण, द्वैतवादी भक्तीचें स्वरूप अर्थातच एकांगी म्हणूनच अपूर्ण व आंधळें होतें. ज्ञानेश्वरांदीनी नामदेवांना आपल्या विचार सरणींत ओढण्याच्या दृष्टीने त्यांच्याबरोबर तीर्थयात्रा केली, "घट" परीक्षा करवून त्यांना कच्चा घट ठरविलें व त्यांना पक्का करण्याच्या हेतूने "अग्नि परीक्षा" करण्याचाहि घाट घातला, शेवटी योगमार्गी खेचराकडून गुरूपदेश देवविला. ह्या प्रयत्नांत कधी ज्ञानेश्वरांना आपल्या विचारांना गुंडाळून ठेवावें लागलें (उदा. तीर्थ यात्रा करण्याचें योग्य कारण त्यांना सांगतां आलें नाही; योगमार्ग हा व्यक्तिगत असून सामूहिक हितासाठी भक्ति मार्गाचीच कास धरावयास हवी हें "कूप" प्रसंगीं मान्य करावें लागलें; इ०) तर कधी नामदेवांना आपल्या विचारांत व प्रवृत्तीत परिवर्तन करावें लागलें (उदा० गुरूपदेशाशिवाय राहणारी अपूर्णता, ज्ञानरहित भक्तीची अपूर्णता; सगुणाबद्दलचा फाजील आपलेपणा इ०) अशा रीतीनें "ज्ञान आणि नाम" यांचा समन्वय झाला. ज्ञानेश्वरांनीहि तात्विक वैचारिक बैठक तयार केली व नामदेवांनी त्या तत्वांचा प्रचार-प्रसार करण्याचें सर्व साधारणापर्यंत त्या तत्वांच लोण पोंचवून त्यांना कार्य प्रवृत्त करण्याचें प्रत्यक्ष कार्य केलें. पुढील अवतरण हेंच दर्शवितें:—"Dnyaneshwer was an intellectual mystic while Namdeo heralds a democratic age. He (Namdeo) ushered in the democracy of devotion… (while the work of Dnyaneshwar) was an intellectual and spiritual". याची जाणीव तुकारामापर्यंत सर्वांना चांगली होती हें "तुका झालासे कळस" या अभंगांतील ज्ञानेश्वर-नामदेवा बद्दलच्या उल्लेखावरून स्पष्ट होतें. ज्ञानेश्वर-नामदेवाच्या "समन्वित भक्तिमार्गांचा" महाराष्ट्रांत घरोघर व समाजाच्या सर्व स्तरांत प्रवेश करविण्याचें खरें कार्य ज्ञानेश्वराचें नव्हे, तीं कामगिरी नामदेव व त्यांच्या "नाम स्मरण — संकीर्तना"च्या सोप्या सहज साध्य मार्गाचे तात्काळ अनुसरण करणाऱ्या इतर संत मंडळाची होय. या संत मंडळाच्या अभावी ज्ञानेश्वरांच्या विद्वत्तापूर्ण "गीतार्थ" प्रबंधाची व त्यांतील तत्वज्ञानाची काय गति झाली असती हा प्रश्न मोठा मनोरंजक आहे. ज्ञानेश्वर हे विचारप्रवर्तक खरे, पण ते सर्वसामान्यांशी एकरूप होऊं शकले असतील, त्यांच्या आचार विचार भावना, आकांक्षा इ० शी समरस होऊं शकले असतील असें म्हणणें अस्वाभाविक व वास्तव परिस्थितीशी विसंगत दिसतें. ज्ञानेश्वर हे खरोखरीच ज्ञानाचे ईश्वर. त्यांच्याबद्दल चोखामेळा,

जना दासी किंवा राका, सांवता, बंका इत्यादि संतांच्या मनांत समतेची भावना उत्पन्न होऊन ते त्यांच्याशी मोकळेपणाने वागूं लागले हें म्हणणें म्हणजे मनुष्य-स्वभाव व वस्तुस्थिति या दोहोंचा विपर्यास होय. निःसंदेह या लोकांच्या मनांत ज्ञानेश्वरांबद्दल असीम श्रद्धा, पूज्य भाव, आदर वसत होता आणि अर्थातच याच कारणामुळे आदरयुक्त अंतरहि अस्तित्वांत होतेंच. तेव्हा जें कार्य ज्ञानेश्वरांना करता येणें संभवनीय नव्हतें तेंच कार्य त्यांच्यातीलच व त्यांच्याच दर्जाच्या नामदेवांना मात्र सहज करता आलें. त्यांच्या नैसर्गिक कीर्तनकौशल्याची मधुर वाणीची, गोड स्वभावाची व परम भक्तीची जोड अर्थातच त्यांना या कार्यात यशस्वी करण्यास कारणीभूत झाली. नामदेव कीर्तनांत दंग असतां प्रत्यक्ष परमेश्वर येऊन नाचत असे. मग सर्वसामान्य संतांची कथाच काय ? ज्ञानेश्वरांच्या अप्रातिम दैवी, अवतारी पुरुषासच साजेशा बुद्धीची प्रभा विलक्षण होती. पंढरीला, संतांना, महाराष्ट्राला जागविण्याचें: विठूचा, हरिनामाचा गजर करून झेंडा गोविण्याचें कार्य नामदेवांनी केलें. या कार्यासंबंधी पुष्कळच विवेचन करण्यात आलेलें आहे. ज्ञानेश्वर नामदेवांमधील नवीनच लक्षित ब्राह्मण-अब्राह्मण प्रवृत्तीच्या प्रादुर्भावाचा व लढ्याचाहि विचार करतां येऊं शकेल, किंवा ही संतांची चळवळ म्हणजे शोषित-शोषक अथवा कामकऱ्यांचा प्रचंड उठाव होता इत्यादि दृष्टिकोणानेहि प्रकाश टाकून मूल्यांकन करता येऊं शकेल. हे सगळें येथें होणें शक्य नाही व प्रस्तुत लेखाचा तो हेतुहि नाही. संतांच्या कामगिरीचें यथातथ्य मूल्यमापन या इतर लहान मोठ्यां संतांना वगळून पूर्णांशाने होऊं शकत नाही इतकी त्यांची कामगिरी महत्त्वाची आहे हेंच येथें दिग्दर्शित करावयाचें आहे.

नामदेवांचें विशेष कार्य

मधला सगळा भाग सोडून नामदेवांच्या उत्तर आयुष्यांतील कामगिरीकडे वळूं. प्रमुख सहकारी संतांच्या परलोकवासानंतर नामदेव पुनः यात्रेस निघाले. मथुरा वृंदावनादि तीर्थयात्रा करीत ते पंजाबांत गेले व पुढे समाधि घेईपर्यंतचा वीस वर्षांचा दीर्घ काळ त्यांनी "घोमान" येथे घालविला. प्रचारकाची भूमिका घेऊन त्यांनी जें कार्य केलें त्या संबंधी विचार करणें नामदेवांच्या कार्याच्या मूल्य-मापनांच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. अगदी संक्षेप करून या काळांतील कार्याचा परिचय करून द्यावयाचा झाला तर असें म्हणावें लागेल कीं (१) या काळांत नामदेवांनी दक्षिणेतील तत्त्वज्ञानाचें लोण उत्तरेत प्रसृत केलें, धार्मिक व सांस्कृतिक आक्रमणाच्या विरुद्ध प्रचंड चढाई करून, परकीय सत्तेची लाट परत लावण्यासाठीं जनतेत जागृती केली व लोकांच्या मनांत धीर, आत्मविश्वास, व लढाऊ वृत्ति आणि विशेषतः सहिष्णु वृत्ति निर्माण केली. (२) या तात्कालीन कामगिरीचाच पुढील परिणाम म्हणजे संत कबीर आणि गुरु नानक यांच्या नेतृत्वाखाली झालेली चळवळ अथवा विचार क्रांति होय.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(१) नामदेव उत्तरेत गेल्यावेळी मुसलमानी सत्ता तेथे प्रस्थापित झाली होती व राजकीय सत्तेबरोबरच धार्मिक व सांस्कृतिक जीवनावरहि हल्ले सुरू झाले होते. त्यांचा संघटित वा व्यक्तिगत प्रतिकार करण्याचें सामर्थ्याहि कोणांत राहिलें नव्हतें. मंदिरांची मोडतोड व मशीदींची उभारणी, स्त्रियांवर अत्याचार व त्यांना भ्रष्ट करणें, धर्म परिवर्तन इ. सर्व परिचित कार्यें सुरू झालीं होतीं. यांतून सुटण्याचा कोणताच मार्ग समोर नसल्यामुळे दैववाद व त्यामुळेच व्रतवैकल्यादि व देवावर भरंवसा ठेवण्याची प्रवृत्तिहि बळावली होती. धर्म परिवर्तन करून घेऊन संरक्षण मिळविण्याचा मार्गहि सोपा होता. एकंदरीत तेथील वातावरण मोठें गढूळ होतें. कोणीच रक्षक नव्हता. विचारवंतांपैकीहि कोणी नव्हता. अशा वेळीं नामदेव दक्षिणेंतील असल्याच स्थितींतील प्राप्त अनुभवाचें लोण घेऊन उत्तरेंत पोंचले. तीर्थ-यात्रेचें केवळ निमित्तच ह्मणावें लागेल. कारण पंजाबांत प्रसिद्ध असें तीर्थ तर नाहींच आणि शिवाय ' घोमान ' हें तर तीर्थ नाहींच नाही. तीच जागा आपलें कार्यक्षेत्र ह्मणून निवडण्याचें कारण निश्चित पणे जरी सांगता येणें कठिण असलें तरी अनुमानाने काढता येऊ शकतें. पंजाबांतील लोकांनाच या आक्रमणाचा अधिक त्राम असला पाहिजे. ह्मणून तेथूनच विचारक्रान्तीचा प्रसार करणें सोईचें असेल. या मध्यवर्ति जागेवरून त्यांनी चहूबाजूस भ्रमण करून राजपुताना हरिद्वार—ज्वालापुर इत्यादि प्रदेशांत आपल्या विचारसरणीचा प्रचार सुरू केला. शिष्यशाखा एकत्र केली, त्यासाठी सतत प्रवास केला, देह धारणेकडे किंवा वेषभूषेकडे लक्ष दिलें नाही आणि शेवटी दोन लक्षांपेक्षाहि अधिक अनुयायांची प्रचंड संघटना निर्माण केली. परप्रांतीयाने इतक्या दूरच्या प्रांतांत येऊन केलेली ही कामगिरी लक्षणीय आहे.

या विचारसरणीचा संपूर्ण विचार येथे करता येणार नाही. पण थोडक्यांत ह्मणजे हिंदू व मुसलमान या दोघांनाहि मानवू शकेल म्हणजेच मुसलमानी धर्माचा स्वीकार न करता त्यांनाहि मान्य होऊ शकेल अशा तत्वप्रणालीचा एक ' सामान्य धर्म ' नामदेवांनी प्रसृत केला. मूर्तिपूजा, तीर्थ यात्रा, स्पृश्यास्पृश्य भेद, बहुदेवोपासना, उच्चनीच भाव इत्यादिंच्याविरुद्ध नामदेवांनीं पुष्कळच हसून खडसून हिंदी मराठी पदांत लिहिलें आहे. व्रतवैकल्य, तप, दान, तीर्थ, इत्यादि सर्व व्यर्थ असून एक ' नामस्मरण ' हेंच मोक्षाचें व परमेश्वरप्राप्तिचें मुख्य साधन प्रतिपादिलेलें आहे. या गोष्टी दोन्ही धर्मांना मान्य होण्यासारख्या किंवा कर्मांतकमी विरोध कमी करण्यास कारणीभूत होणाऱ्या होत्या. नामदेवांची ही कामगिरी उत्तरेंत हिंदू धर्माला जिवंत ठेवण्यास कारणी-भूत झाली. हा वेळपर्यंत उत्तरेस कोणतीच संघटित प्रतिकारात्मक चळवळ दिसत नाही. दक्षिणेंतील रामानुजादींच्या विविध पंथोपंथाच्या भेदभावांची लाट उत्तरेपर्यंत पोंचली नव्हती. कबीर आणि नानक अद्याप अवतीर्ण व्हावयाचे होते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बंगालमधील चळवळीचेंहि लोण अद्याप उत्तर भारतांत पोंचलें नव्हतें. या सर्व परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नामदेवांच्या कार्याचें विस्तृत मूल्यमापन व्हावयास हवें.

(२) कबीर आणि नानक यांना कसें स्वतंत्र अस्तित्व असून एकंदर भारतीय जगांत कसें मानाचें स्थान आहे हें सर्वज्ञात आहे. हें अर्थातच त्यांच्या तत्वज्ञानांवर आधारलेल्या कामगिरीच्या दृश्यस्वरूपामुळे होय. एका वाक्यांत कबीरांचें तत्वज्ञान द्यावयाचें तर त्यांना उपयुक्त 'सामान्य मार्गाचें' प्रणेते मानतात. "निर्गुण पंथ" म्हणून उत्तर भारतांत सर्वज्ञात असलेल्या पंथाचे त्यांना प्रथम प्रवर्तक मानतात. पण या तत्वज्ञानाचें "मूळ" नामदेवांच्या दोन-दीड शतकें पूर्वीच प्रसृत असलेल्या तत्वज्ञानांत सांपडतें व ही गोष्ट हिंदीचे इतिहासकारहि मानतात. कबीरांसाठी मार्ग तयार करणाऱ्यांमध्ये नामदेव व योगमार्गी नाथपंथी असल्याचें ते म्हणतात. अन्य नाथपंथी उत्तर हिंदुस्थानांत कोणी असल्याचें निश्चित असें प्रमाण उपलब्ध नाही. नामदेवाबद्दल मात्र निःसंदिग्धपणे म्हणतां येऊं शकतें कीं ते भक्तिमार्गी तर होतेच पण केवळ परिचयाने नव्हे तर गुरुपरंपरेनेहि नाथपंथीच होते. म्हणजेच योगमार्गाशी त्यांचा परिचय होता. अर्थात कबीरांच्या विचारसरणीवर नामदेवांचा प्रभाव होता हें स्पष्ट आहे. हाच प्रकार नानकांबद्दल दिसतो. आपल्या धर्मग्रंथांत त्यांनी नामदेवांच्या ६१ पदांचा समावेश केला ही गोष्ट नामदेवांचा त्यांच्यावर कसा प्रभाव होता हें दर्शविण्यास पुरेशी आहे. अंतःप्रमाणांवरून या विधानांची सहज पुष्टी करता येते. अर्थात तें कार्य येथें करण्याची आवश्यकता नाही.*

नामदेवांची हिंदी पदें व त्यांतील तत्वज्ञान

पुष्कळ मराठी संतांची हिंदींत रचना केली आहे. परंतु हिंदी भाषाभाषीयांत त्या पैकीं फारच थोड्यांची ओळख आहे. तुकारामाशिवाय इतरांचा फारसा परिचय हिंदी लोकांना असावा असें वाटत नाही. "संत तुकाराम" हा डॉ. दिवेकरांचा ग्रंथ वगळला तर बहुतेक मराठी संतविषयक लेखन इंग्रजीत किंवा मराठींत आहे. प्रा. रानडे यांचा "Mysticism in Maharastra" हा ग्रंथ या दृष्टीने उल्लेखनीय आहे. पण सर्वसामान्यपणे अद्याप हें सगळें दालन अज्ञातच आहे आजच्या अंतःप्रांतीय साहित्याच्या घेवाण देवाणीच्या इष्टतेच्या काळीं तर मराठी लेखकांच्या साहित्याचा व विशेषतः हिंदी रचनेचा परिचय करून देण्यासारखा आहे. तुकारामाप्रमाणेच नामदेवहि हिंदी साहित्यिकांना परिचित आहेत खरे, पण अनेक कारणांमुळे त्यांना नामदेवाविषयी यथार्थ ज्ञान नाही हें त्यांच्या इतिहास ग्रंथांतील नामदेव विषयक माहिती वरून स्पष्ट कळतें. अर्थात हें

* प्रा. मुंडी, यांनी आचार्य परिक्षेसाठीं "नामदेव" हा आपला प्रबंध विषय ठरवून संशोधन सुरू केलें आहे. त्यांत या संबंधी विस्तृत व सप्रमाण चर्चा केलेली आहे.—संपा० युगं०

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कार्य करणें आवश्यक आहे. नामदेव विषयक हिंदी साहित्य फारच थोडें व तेंहि अपूर्ण त्रोटक व प्रसंगी विपर्यस्त स्वरूपांत आहे. रा. जोशी यांचें "भक्त नामदेव" फारच अपूर्ण वाटतें.*

नामदेवांची हिंदी पदसंख्या १२५ पर्यंत वधेल. अर्थात् त्यांत प्रक्षिप्त भागहि आहेच. प्रामाण्याच्या दृष्टीने ग्रंथसाहेबांतील ६१ पदें महत्त्वाचीं आहेत. बाकी पदांबद्दल अद्याप सर्वच क्रिया व्हायला हव्यात.

काव्य या दृष्टीने कोणत्याच संताने लिहिलेलें नाही आत्म्याची अभिव्यक्ति एवढेंच या पदांचें स्वरूप. तरीहि काव्यगुणांचा त्यांत अभाव आहे असें नव्हे. नामदेवांची हिंदी पदेंहि याला अपवाद कशीं असणार? त्यांतहि जागोजागी उपमा, दृष्टांत, रूपक, कल्पना, भाषासौंदर्य आहेच. पण नामदेवांच्या हिंदी पदांचें हें वैशिष्ट्य नव्हे. एक तर त्यांतील तत्त्वज्ञान व दुसरी अभ्यासयोग्य बाब म्हणजे भाषेचें स्वरूप.

(१) हिंदी पदांतील तत्त्वज्ञानाची संपूर्ण कल्पना येथे देता येणार नाही. तरीहि हें तत्त्वज्ञान त्यांच्या उत्तर आयुष्यांतील असल्यामुळे परिपक्व, अनुभवानंतर निश्चित ठरविलेलें, तरीहि दक्षिणेतील मराठी अभंगांतील तत्त्वज्ञानाशी फारसें विसंगत नसलेलें असें आहे. "परमेश्वराचें नामस्मरण हाच मुक्तीचा खरा व एकमेव मार्ग" असल्याचें ते म्हणतात. याशिवाय इतर सर्व व्यर्थ किंवा खोटें आहे. एक तोच परमेश्वर सर्व कांही आहे. त्याच्यापुढे भैरव, शीतला, महामाई, शिव, भवानी इ० सर्व फिके आहेत. तसेच वेद व्यर्थ होत, शास्त्रांचा कांही उपयोग नाही. एकादशी आदि व्रतें व्यर्थ आहेत. जप, तप, दान, तीर्थ, यज्ञ-याग, स्नान ह्या सगळ्या गोष्टी व्यर्थ आहेत. ते म्हणतात—

मन छोडि छोडि सगल भेदं। सिमरि सिमरि गोविंदं।
भजु नामा तरसि भवसिंधं॥ (गुरुग्रंथ, पद २३)

मराठी अभंगाप्रमाणेच हिंदी पदांतील बराचसा भाग या सगळ्या विविध प्रवृत्तींवरील आघाताकडे खर्च झालेला आहे. याशिवाय गुरूमाहात्म्य, भक्ति माहात्म्य, नाम माहात्म्य तसेच जातिभेद, उच्चनीच भाव, मूर्तिपूजा इत्यादि वरहि टीका केलेली आहे.

(२) हिंदी पदांतील व्याकरणाचा अर्थात् भाषेचा अभ्यास नामदेवांचें महाराष्ट्रीयत्व सिद्ध करण्यास सहायक होणारा आहे. शिवाय प्राकृत भाषांचाहि

---

* प्रस्तुत लेखकाने नामदेवांच्या ६०० व्या पुण्यतिथीच्या प्रसंगी हिंदी लोकांना केवळ परिचय करून देण्याच्या मर्यादित हेतूने "भक्तश्रेष्ठ नामदेवजी" ही पुस्तिका लिहिली आहे. अर्थात तेवढ्याने भागण्या सारखें नाही. यापेक्षा पुष्कळच जास्त कार्य व्हावयाचें आहे—संपा० युग०

तदनुषंगाने पुष्कळच अभ्यास होणारा आहे. त्यांच्या भाषेंतील मराठीचीं रूपें, क्रिया, विभक्ति प्रत्यय, इतर शब्द यांचा अभ्यास मनोरंजक होणारा आहे. मी "भक्तश्रेष्ठ नामदेवजी" मध्ये व्याकरण विषयक चर्चा केलेली सांपडेल.

उपर्युक्त सगळ्या विवेचनाचें तात्पर्य एवढेंच कीं ज्ञानेश्वर–तुकाराम–रामदास यांच्या प्रमाणेच नामदेवाचें स्वतंत्र स्थान आहे. आजवर यासंबंधी आवश्यक तेवढें संशोधन तसेंच अध्ययन झालेलें नाही. नुकत्याच गेल्या ऑगष्ट ११ ला झालेल्या ६०० व्या पुण्यतिथीच्या निमिताने या प्रचारक संतश्रेष्ठाच्या विषयी कांही तरी भरीव कार्य होईल अशी अपेक्षा होती. निदान त्यांच्या अभंगाची संशोधित, सटीप प्रत तरी तयार होईल असें वाटत होतें; परंतु रा. आजगांवकर यांच्या "नामदेवा" प्रमाणेच रा. सरदेसाई यांचें लहानसें पुस्तक मात्र प्रकाशित झालेलें दिसलें. रा. सुबंध द्वारा संपादित गाथेचा पहिला भाग उपयुक्त व विस्तृत असला तरी फारसा चिकित्सक नाही. त्यांत चिकित्सकतेपेक्षा भक्ति भावच अधिक प्रतीत होतो. सांप्रदायिकांच्या दृष्टीने हें पुस्तक चांगलें आहे. रा. फाटक, रा. प्रियोळकर किंवा रा. कोलते यांचा नामदेवासंबंधीच्या सुट्या परंतु महत्त्वाच्या व मूलगामी, विचार परिप्लुत तसेंच विद्वत्तापूर्ण लेखाप्रमाणे विस्तृत अथवा ग्रंथरूप साहित्य निर्माण होणें इष्ट आहे. विशेषतः नामदेवासंबंधी. लिहिण्यासाठी मराठी बरोबरच हिंदी व प्रसंगी पंजाबी साहित्याचा परिचय असणें किती अपरिहार्य आहे याची कल्पना प्रस्तुत लेखातील कबीर व नानक विषयक संक्षिप्त व सूचक दिग्दर्शनावरून स्पष्ट आहे. अर्थात् असलें महत्त्वाचें कार्य अधिकारी लेखकाने हाती घेतल्यास मराठी साहित्यात फार मोठी महत्त्वाची भर पडणार आहे.

वागायाचे असेंच होतें

वागायाचे असेंच होतें
  वागलीस तर तशी कशाला ?
मारायाचें असेंच होतें
  दिधलें जीवन तसें कशाला ?
ज्योतींतच मी विलीन व्हावें
  असें तुझ्या कां मनांत होतें ?
लोचनांत मग दाविलीस कां
  खोटी प्रीति भावहि खोटे ?

करावयाची असीच होती
  तुला निराशा माझी अंतीं !
हृदयीं माझ्या पाउल ठेउन
  तशी तेवविलि कशाला ज्योति ?
कुजबुज केली तशी कशाला
  वागायाचें असेंच निष्ठुर ?
कशास केलें तसें जवळ मज
  झिडकारुन ग द्यायाचें जर ?

समजूं अथवा हेंही लटिके
  मुग्ध अशी कां झणीं बोल ना !
'असें' वागणें ? छे! छे! रुसवा
  म्हणुनी करिशिल प्रीतियाचना ?

—मनोहर सरपटवार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'५१
वारी

नाटककार कोल्हटकर*

★

सात वर्षापूर्वी महाराष्ट्रांत ठिकठिकाणी मराठी रंगभूमिचा शतसांवत्सरिक उत्सव साजरा झाला. त्यामुळे मराठी साहित्य-सेवकांत आणि कलावतांत एक प्रकारे नवीन चैतन्य संचरले. अनेक हौशी रसिक त्यावेळीं नट म्हणून पुढें आले. मराठी रंगभूमीच्या आणि नाट्याच्या चर्चेला त्यावेळीं जी सुरवात झाली ती अजून संपली आहे असे दिसत नाही. ह्या चर्चेतून नवीन तरूणांना नाट्याभिरुचीचे शिक्षण मिळाले. जुन्या नव्या नाटकांचे नवीन दृष्टिकोणांतून, विशेषतः प्रायोगिक दृष्टीने मूल्यमापन सुरू झाले. आपापल्या परी मराठी रंगभूमीचा भविष्यकाळ उज्वल करण्यासाठी प्रत्येकजण हातभार लावू लागला. या आंदोलनांतून जे कांही नवीन नाट्यप्रेमी आणि टीकाकार रसिकांसमोर आले. त्यांत श्री. द. रा. गोमकाळे यांचा अंतर्भाव प्रामुख्याने करावा लागेल. श्री. गोमकाळे यांना नाटकांतून कामे करण्याची उपजतच फार हौस. सौभद्र, संन्याशाचा संसार, पूर्वग्रह अशा पुष्कळ नाटकांत त्यांनी यशस्वी रीतीने कामें केलेली आहेत. कांही नाट्य तज्ञांचे योग्य दिग्दर्शन त्यांना त्यावेळी लाभले. शिवाय योगायोग असा की एम. ए. च्या परीक्षेसाठी नाट्यवाङमयाच्या स्वतंत्र प्रश्न पत्रिकेचा त्यांना अभ्यास करण्याची संधी मिळाली आणि तीहि प्रा. श्रीनिवास नारायण बनहट्टी यांच्या सारख्या नाट्यमर्मज्ञ टीकाकाराच्या नेतृत्वाखाली. या सर्व परिस्थितीचे योग्य ते संस्कार श्री. गोमकाळे यांच्यावर होऊन त्यातून त्यांचे आजचे अभिजात नाट्यरसिकत्व आकाराला आलेले आहे असे म्हणणे चुकीचे होणार नाही. रंगभूमी आणि नाट्यवाङ्मय यांच्याशीं श्री. गोमकाळे यांचा असा घनिष्ट संबंध असल्यामुळे या दोन्ही विषयावर लिहिण्याचा त्यांना अधिकार प्राप्त झालेला आहे. रंगभूमी आणि नाट्यवाङ्मय यांच्या विषयी नुसती आवडच नाही तर एकप्रकारची आत्मीयता त्यांच्याठिकाणी आढळते. यांच्याच जोडीला त्यांच्या ठिकाणीं लेखनाची हौसहि आहे. या हौशीतूनच 'नाटककार कोल्हटकर' हा त्यांचा ग्रंथ नुकताच बाहेर पडलेला आहे. पांचसहा महिन्यापूर्वी 'रांगणेकर आणि मराठी रंगभूमी' ही

---

* नाटककार कोल्टकर: लेखक--श्री. द. रा. गोमकाळे सिव्हिल जज्ज मलकापूर. प्रकाशक: अरुण प्रकाशन मलकापूर (वऱ्हाड) पृष्ठ संख्या ४०+३३६ किंमत ५ रुपये.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांची पुस्तिका प्रसिद्ध झाली आणि तिने वर्तमानपत्रांच्या जगांत चांगलीच खळबळ उडवली. त्यामुळे टीकाकार या नात्याने श्री. गोमकाळे हे महाराष्ट्राला परिचित झाले. त्या पुस्तिकेच्या मागोमाग प्रसिद्ध झालेल्या 'नाटककार कोल्हटकर' या त्यांच्या पुस्तकाने हा परिचय अधिक वाढेल व नाट्यवाङ्मयाच्या टीकाकारात त्यांचे स्थान निश्चित होईल याविषयी शंका नाही. त्यांच्या प्रबंधाला महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कादंबरीकार आणि मार्मिक टीकाकार श्री. वि. स. खांडेकर यांची प्रस्तावना लाभली आहे हा त्या पुस्तकाचा विशेष होय. प्रस्तावनेत श्री. खांडेकर यांनी श्री. गोमकाळे यांच्या टीकादृष्टीचा केलेला सकौतुक पुरस्कार म्हणजे श्री. गोमकाळे यांना मिळालेले एक उत्तम प्रशस्तिपत्रक मानायला हरकत नाही.

मराठी रंगभूमी आणि नाट्यवाङ्मय यांना आपापल्या परी ज्यांनी स्वतंत्र वळण लावले आणि त्यांचा विकास घडवून आणला अशा पाच नाटककारांमध्ये श्री. श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब कोल्हटकर यांचा निश्चित समावेश होतो. श्री. अण्णासाहेब किर्लोस्कर गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर आणि राम गणेश गडकरी हे नाट्य साहित्याच्या मंदिरातील पंचायतन होय यापैकी प्रत्येकाचे कार्य इतरांच्या कार्याहून कांही बाबतीत स्वतंत्र आणि वेगळे असे आहे. कोल्हटकर व खाडिलकर यांनी अनुक्रमे बारा व पंधरा नाटके लिहिली आणि या दोघांनीहि अनेक वर्षे पर्यंत मराठी रंगभूमीवर अनभिषिक्त साम्राज्य गाजावले. कोल्हटकरांच्या नावाने तर त्यांच्या शिष्यांनी एक नवीन संप्रदाय सुरू करून नाट्याच्या क्षेत्रात युग प्रवर्तक म्हणून मानाचे पान त्यांना अर्पण केले. आणि ते कांही अंशांनी बरोबरहि आहे. रसिकांचे आजहि अत्यंत आवडते असलेले गडकरी यांनी कोल्हटकरांना स्वतंत्र शक्तीचे नाटककार म्हणून गौरविले असून आपले परमपूज्य लेखनगुरू मानले होते 'कृपाचि ज्यांची कारण केवळ मम पामर वचनाते। वंदुनि त्या श्रीपाद पदांप्रती – असा त्यांचा कृतज्ञपूर्वक उल्लेख भावबंधन नाटकाच्या आरंभी त्यांनी केलेला आहे. आपल्या श्री महाराष्ट्र गीतात 'जिथे रंगली साधी भोळी जनाईची गाणी। तिथेच खेळे श्रीपादांची कलावती वाणी' असा निर्देश त्यांनी केलेला आहे. यावरून गडकऱ्यांना कोल्हटकरांच्या कलाकुशल लेखना विषयी केवढा आदर होता याची कल्पना येईल. गडकऱ्यांचेच शिष्यत्व आचार्य अत्रे मान्य करतात. तेव्हां एका अर्थाने कोल्हटकर हे अत्र्यांचे परात्पर गुरु होत. वरेरकरांनीहि कोल्हटकरांचे शिष्यत्व स्वीकारून त्यांचाच संप्रदाय आपल्या नाटकातून पुढे चालवलेला आहे. टीकेच्या क्षेत्रात श्री. खांडेकर आणि माडखोलकर यांनी त्यांना गुरुत्व अर्पण केलेले असले तरी या दोन्ही टीकाकारांनी आपल्या या पितृतुल्य गुरूच्या नाट्यकृतीचे सविस्तर समालोचन केलेले नाही, ही गोष्ट मनाला फार जाणवते. नाही म्हणायला श्री खांडेकरांनी फार वर्षापूर्वी मासिक मनोरंजनामधून कोल्हटकरांच्या नाटकावर एक लेखमाला मात्र लिहिली होती. माडखोलकरांनी तर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तेहि केलेले नाही. अत्रे आणि वरेरकर यांनीहि एकंदरीत मुक्याचेच व्रत स्वीकारलेले दिसते याचमुळे श्री. गोमकाळे यांच्या या नवीन पुस्तकाचे मला विशेष महत्व वाटते. कोल्हटकरांच्या सर्व नाटकांचा इतका विस्तृत व एकत्रित परामर्श घेणारे मराठी टीकावाङ्मयांतील हे पाहिलेच पुस्तक होय. त्याबद्दल श्री. गोमकाळे निःसंशय अभिनंदनास पात्र आहेत यात मुळीच शंका नाही. तसे पाहिले तर कोल्हटकर नाटककार या दृष्टीने जवळजवळ आज स्मृतिशेष झालेले वाटतात. प्रा. फडके यांच्यासारखे रसिक टीकाकार उत्तम नाटककारांची गणना करतांना कोल्हटकरांचे नांवहि उच्चारीत नाहीत म्हणून श्री. खांडेकरांनी तक्रार केलेली आहेच आणि सुमारे पंधरा वर्षांपूर्वी माडखोलकरांनाहि कोणते उद्‌गार ऐकूं येत होते ! कोल्हटकरांची नाटके रंगभूमीवरून आधीच अस्त पावलेली असून कालांतराने लोकांच्या स्मृतींतूनहि ती लुप्त होत जातील." अशा आशयाचे, त्यावेळच्या काही टीकाकारांचे उद्‌गार त्यांनी नमूद करून ठेवलेले आहेत. हे उद्‌गार आज अगदी खरें ठरलेले नाहीत काय? एखाद्या संप्रदायांतील अनुयायी नाटककारांच्या नाट्यकृतींनी मराठी वाङ्मयांत चिरस्मरणीय स्थान मिळवलेले असावे पण संप्रदायप्रवर्तकाच्या नाटकाचे आज कुणाला फारसे स्मरणहि होऊं नये हा योगायोग म्हणजे अत्यंत खेदजनक असा दैवदुर्विलासच होय ! अशा परिस्थितीत कोल्हटकरासारख्या, एक वेळ श्रेष्ठ म्हणून मानल्या गेलेल्या नाटककाराच्या ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास करून करून त्यावर श्री. गोमकाळयांनी विस्तृत प्रबंध लिहावा हे त्यांच्या साक्षेपीपणाचे आणि नाट्यप्रेमाचे द्योतक नाही काय ?

'नाटककार कोल्हटकर' हा प्रबंध श्री. गोमकाळे यांनी एकूण पंधरा प्रकरणांत विभागला आहे. प्रबंधाच्या प्रारंभी परीक्षणाची भूमिका त्यांनी विशद करून सांगितली आणि त्याप्रमाणे कोल्हटकरांच्या प्रत्येक नाटकाचे स्वतंत्ररीतीने पुढील बारा प्रकरणांत विस्ताराने परिक्षण केलें. चौदाव्या प्रकरणांत नाटकाच्या प्रयोगक्षमतेविषयीं आधी तात्त्विक विवेचन करून मग त्या विवेचनाच्या अनुषंगाने तात्यांच्या नाटकांचे त्यांनी मूल्यमापन करून पहिले 'समालोचन' या शेवटच्या प्रकरणांत कोल्हटकरांच्या सर्व नाटकांतलि कांही ठळक गुणदोष आधी उदाहरणादाखल आणि मग कोल्हटकर संप्रदायाचें थोडक्यांत वर्णन करून आपला प्रबंध त्यांनी संपविला. संपूर्ण ग्रंथाचा आराखडा थोडक्यांत हा असा आहे प्रत्येक नाटकाचे परीक्षण करतांना आरंभी त्या नाटकाच्या लेखनाचा व प्रयोगाचा इतिहास श्री. गोमकाळयांनी सांगितला. त्यानंतर नाटकाचे थोडक्यांत कथानक निवेदन करून मग त्यांतील गुणदोषांचे दिग्दर्शन केले आहे. समालोचनाची अशी ही साधी आणि सुतासारखी सरळ पद्धति श्री. गोमकाळे यांनी स्वीकारल्याचे दिसून येते.

'परीक्षणाची भूमिका' व 'नाटक आणि प्रयोगक्षमता' ही या टीकाग्रंथांतील दोन प्रकरणे महत्वाची म्हणून विशेष डोळ्यांत भरतात. त्यावरून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. गोमकाळे यांच्या व्यासंगाची उत्तम कल्पना येते. नाटक म्हणजे काय, त्याच्या निर्मितीचा मुख्य हेतु कोणता, नाट्यद्वारा रंजन कुणाचे आणि कसे होते नाटकाचा एखादा साचा मानता येईल काय, नाटकाचा आत्मा कोणता आणि इतर घटक कोणते इत्यादि अनेक प्रश्नांचा श्री. गोमकाळे यांनी 'परीक्षणाची भूमिका' या प्रकरणांत उद्बोधक ऊहापोह केलेला आहे. बुइल्यम आर्चर, एलिझाबेथ ड्र्यू आदि नाट्य-वाङ्मयावरील आंग्ल टीकाकारांच्या मतानुरोधाने श्री. गोमकाळे यांनी केलेले हे विवेचन अभ्यासकांना चांगले मार्गदर्शक होऊ शकेल. 'नाटक आणि प्रयोग-क्षमता' या प्रकरणांतहि त्यांनी केलेले तात्त्विक विवेचन सरस उतरलेले आहे. ही दोन्ही प्रकरणे वाचीत असतांना आंग्ल टीकाकाराप्रमाणेच संस्कृत साहित्यकारांच्या विवेचनाचाहि श्री. गोमकाळे यांनी उपयोग करून घेतला असता तर अधिक बरे झाले असते असें वारंवार वाटल्यावाचून मात्र रहात नाही. तथापि या स्थितींतहि ही दोन्ही प्रकरणे चांगली लिहिली गेली यांत शंका नाही.

हा टीकात्मक प्रबंध संपूर्ण वाचून झाल्यावर कोल्हटकरांची नाटके मुळांतून वाचण्याची उत्कंठा रसिक वाचकांच्या मनांत निर्माण होईल असे वाटत नाही. हा दोष श्री. गोमकाळे यांचा आहे असे मला म्हणायचे नाही. त्यांनी आपल्या पद्धतीने नाटकातील गुणदोषांचे विवेचन केले आहे; पण ते वाचल्यानंतर 'नाट्य' दृष्ट्या कोल्हटकरांची नाटकें फारशी श्रेष्ठ दर्जाची नाहीत मनाचा ग्रह होतो आणि तो बरोबर आहे. मी स्वत: कोल्हटकरांची नाटके कॉलेज-मधें असतांनाच वाचली होती. नाट्यानंद लुटण्यासाठी ती नाटके आता पुन्हा वाचण्याची इच्छा माझ्या मनामधे निर्माण होत नाही. माझ्या या अनुभवाला श्री. गोमकाळे यांच्या या प्रबंधाने दुजोरा मिळालेला आहे. कोल्हटकरांच्या नाटकाची कथानके स्वतंत्र आहेत, रहस्यमय आहेत, गुंतागुंतीची आहेत; त्यात विवाहविषयक विविध प्रश्न आहेत, त्यांची गंभीर चर्चाहि आहे; भाषेचा विलास देखील त्यांत सुंदर आहे. चमत्कृतिजनक कोटिक्रम, त्यावर आधारलेला नर्म विनोद आणि अभिनव कल्पना त्यांच्या नाटकांत इतस्ततः विखुरलेल्या आहेत; हे सर्व खरे आहे. पण रंगभूमीसाठी आवश्यक असलेले 'नाट्य' मात्र त्यांत नाही. कथाविकासाची आणि स्वभाव परिपोषाची जी नाजुक कलाकुसर खाडिलकरांच्या नाटकांत दिसते तिचा कोल्हटकरांच्या नाटकांत आत्यंतिक अभाव आढळतो. अशा स्थितींत त्या नाटकांच्या वाचनाने मनाला नाट्यानंद व्हावा कसा? म्हणूनच मला असे नेहमी वाटत आले आहे की कोल्हटकरांच्या नाटकांना आज केवळ ऐतिहासिक महत्त्व आहे आणि तेवढेच ते पुढे कायम राहील. चिरंतन वाङ्मयाच्या दृष्टीने ती नाटके आजच स्मृतीतूनहि नाहीशी होत चाललेली आहेत, यांत शंका नाही. कोल्हटकरांच्या या अपयशाला अनेक कारणे आहेत. श्री. गोमकाळे यांनी त्यातील काही कारणांची योग्य मीमांसाहि केली आहे. कोल्हटकरांनी प्रेक्षकांचा अनुनय केला नाही; त्यांच्या नाटकाचे वातावरण

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बहुजनसमाजाला रुचणारे व पटणारे नाही; त्यांतील भाषा सामान्य प्रेक्षकांच्या बुद्धीला आकलन करता येण्यासारखी नाही; कथानकांतील प्रसंग भडक नाहीत आणि त्यांतून उदात्त ध्येयाचे दर्शन घडत नाही अशी अनेक कारणे त्यांनी सांगितली तथापि कोल्हटकरांच्या नाटकांतील मुख्य दोषावर त्यांनी सरळ आणि प्रत्यक्ष बोट ठेवलेले आहे असे वाटत नाही ते प्रस्तावनेंत खांडेकरांनी बरोबर ठेविले आहे. यशस्वी नाटककार होण्यासाठी अवश्य असलेले नाट्य तंत्रच मुळी कोल्हटकरांना साध्य नव्हते असे श्री. खांडेकर म्हणतात आणि तेच बरोबर आहे. मला तर असे वाटते की कोल्हटकरांच्या नाटकांतील कांही वैशिष्येहि त्यांच्या या अपयशाला कारणीभूत झालेली आहेत. उदाहरणार्थ, स्वतंत्र कथानकांची रचना हा त्यांच्या नाट्यकृतींचा एक महत्त्वाचा विशेष समजला जातो. पण त्यामुळेच प्रत्येक नाटकात त्यांची तारांबळ उडालेली दिसते. आरंभापासून तो शेवटपर्यंत कथानकाच्या रचनेतच त्यांच्या प्रतिभेला अडकून पडावे लागलें. आणि म्हणून कथानकातील पात्रांच्या स्वभाव-परिपोषाकडे अथवा विकासाकडे लक्ष देण्याची त्यांना फारशी सवडच सापडली नाही असे दिसते. एक 'जन्मरहस्य' नाटक सोडले तर त्यांच्या कोणत्याहि नाटकाचे कथानक आटोपशीर नाही. बरे, जी कथानक स्वतंत्र म्हणून त्यांनी तयार केली ती तरी त्यांना नाट्यात्मकतेने मांडता आली आहेत काय? मुळीच नाही. यशस्वी नाटकाला 'नाट्या'ची गरज असते याची कोल्हटकरांना जाणीव होती की नाही याचीच अनेकदा शंका वाटायला लागते, म्हणूनच 'नाट्यतंत्र' त्यांना साध्य नव्हते असे श्री. खांडेकरांनीं प्रस्तुत पुस्तकाच्या प्रस्तावनेत जे अगदी स्पष्टपणे म्हटले आहे ते तावडतोब पटते. श्री. गोमकाळे यांनी असा निश्चित निष्कर्ष काढलेला वाटत नाही तो त्यांना प्रतीत झालेला असला तरी त्याचा इतक्या स्पष्ट रीतीने उल्लेख करण्याचें त्यांना धैर्य झाले नसावे असे मला वाटते. म्हणूनच कोल्हटकरांच्या अपयशाची मीमांसा करताना कांही गैरलागू कारणांचा त्यांनी वाजवीपेक्षा जास्त पसारा मांडला आहे. किर्लोस्कर नाटक मंडळी काही काळ फक्त कोल्हटकरांचीच नाटके करीत असे. त्यामुळे इतर नाटककार रुष्ट होत असत आणि म्हणून ते कोल्हटकरांची नाटके अयशस्वी ठरावी असा अनुदारदृष्टीत प्रयत्न करीत असत. उदा:— 'मतिविकार' नाटक पडले त्याला विषारी प्रचार हे एक कारण होते असे श्री. गोमकाळे म्हणतात. बरं, 'प्रेमशोधन' नाटक का पडले? तर त्यावेळेला रंगभूमीवर अन्यत्र मानापमान नाटक गाजत होते म्हणून! 'परिवर्तन' नाटक श्री. गोमकाळे यांच्या दृष्टीनें यशस्वी होऊ शकले असते! पण मग ते यशस्वी कां झाले नाही? गोमकाळे म्हणतात "दुर्दैव त्या नाटकाचे!" 'सहचारिणी' नाटक, मूळातच चांगले नाही, पण, प्रयोगाच्या वेळी नटांनी त्याचा वाईटपणा दसपट वाढवला. दुसरे कारण असे की खाडीलकरांचे 'द्रौपदी' नाटक रंगभूमिवर आणावयाचे असल्यामुळे बाल गंधर्वांनी या नाटकाकडे जाणून बुजून दुर्लक्ष केले!

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'जन्मरहस्य' या नाटकाचाहि बलवंत संगीत नाटक मंडळीने 'चेंदामेंदा करून टाकला' म्हणून ते सांगतात. सारांश, विषारी टीका आणि नटांची प्रतिकूलता ही कारणे कोल्हटकरांच्या अपयशासाठी लेखकाकडून पुढें वारंवार करण्यात आली आहेत. मला वाटते कीं कोल्हटकरांची वैगुण्ये झाकण्यासाठी बिचाऱ्या टीकाकारांना व नटांना श्री. गोमकाळे यांनी व्यर्थ दोष दिला आहे. कोल्हटकरांच्या नाटकांचे प्रायोगिक मूल्य आज देखील कितपत आहे, ते त्यांनी तपासून पहावे म्हणजे काय निष्पन्न होते ते सहज दिसून येईल! किंबहुना, प्रयोगाच्या कलात्मक अंगाकडे कोल्हटकरांचे विशेष लक्ष होते असे दिसतच नाही. श्री. गोमकाळे यांनी ही गोष्ट थोड्याफार आड वळणाने सुचवलेलीहि आहे. मग प्रश्न असा की प्रयोग दृष्ट्या कोल्हटकरांची नाटके मुळांतच जर कमी प्रतीची होती तर मग बिचाऱ्या नटांना आणि टीकाकारांना दोष का? याचे कारण इतकेच की कोल्हटकरांच्या भोवती अलौकिकत्वाचे जे दिव्य वलय त्यांच्या कांही शिष्यांनी निर्माण करून ठेवलेले आहे त्यांतून श्री. गोमकाळे यांना इतक्यात बाहेर पडता आले नाही।

मतभेदांचे असे कांही मुद्दे असले तरी कोल्हटकरांच्या नाटकाविषयी श्री. गोमकाळे यांचे इतर विवेचन बरेच समतोलपणाचे झालें आहे यांत शंका नाही. आधुनिक नाट्यशास्त्रावरील ग्रंथांशीहि श्री. गोमकाळे यांचा चांगला परिचय दिसून येतो. त्यांची स्वतःची लेखनपद्धती मात्र बरीच शिथिल आहे. तिच्यात ओबडधोबडपणाहि आढळतो. कोल्हटकरांच्या नाट्य रचनेंत जशी नाजुक कलाकुसरत नाही तशी त्यांच्या या टीकाकाराच्या लेखनशैलीतहि नाही. स्वतः कोल्हटकर आपल्या सर्वच लेखनातील भाषेच्या शुद्धतेकडे अतिशय लक्ष देत असत ही गोष्ट श्री. गोमकाळे यांनी लक्षात घेतली असती तर तिचा त्यांना फार उपयोग झाला असता. या उणिवा त्यांच्या यानंतरच्या लेखनात ते सहज भरून काढू शकतील. त्यांची नाट्यवाङ्मयावरील निष्ठा व त्यांच्या अभ्यासाची आस्था मात्र अत्यंत अभिनंदनीय आहे. एकेका ग्रंथकारांचे समग्र साहित्य काळजीपूर्वक अभ्यासण्याची प्रवृत्ती अलिकडे दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. अशा परिस्थितीत कोल्हटकरांच्या नाटकांचे समग्र दर्शन घडवून त्यांतील गुणदोषांची चिकित्सा करणारा, श्री. गोमकाळे यांचा हा ग्रंथ अभ्यासकांना निश्चित मार्गदर्शक आणि उपयुक्त होईल!

---

* नागपूर नभोवाणीच्या सौजन्याने.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्यनिर्मात्यापुढील यक्ष प्रश्न

वसंत वरखेडकर

*

एका यक्ष प्रश्नानें माझें मन व्यक्ति म्हणून आपण जी कल्पना करीत असतों तीच सत्यार्थपूर्ण (Real) आहे की साहित्यनिर्माता म्हणून दुसरें एखादें व्यक्तिमत्व अधिक सत्यार्थपूर्ण आहे ?

साहित्यनिर्मात्याला चारित्र्य दृष्ट्या निकालांत काढून त्याच्या साहित्याचीहि वासलात लावण्याचा प्रकार कांही नवा नाही. वास्तवांत तर नेहमीच असें आढळतें की प्रतिष्ठावंतांच्या इटुकल्यामिटुकल्या लिखाणाचें हि कोण कोडकौतुक ! उलट जातीमुळें, पैशाच्या अभावामुळे आणि पेशामुळे मागे राहिलेल्याचें बहुधा अनुल्लेखानेच मरण, जों पर्यंत क्ष यांच्याबद्दल य यांचें मत उत्तम तोंपर्यंत याच्या मतें, वाहवा ! क्ष सारखा लेखक नाही ! आणि क्ष ने जर य ला दुखावलें तर क्ष चें साहित्य भिकार ठरलेंच म्हणून समजा. वास्तवांत हें जें घडतें तें योग्य नाही खरें. पण असें कां घडावें ह्यालाहि खोलवर रुजलेला व्यक्तित्वाच्या व्याख्येविषयीचा लोकभ्रमच कारण आहे.

व्यक्तिविषयक वाईट ग्रह झाला म्हणजे त्या व्यक्तीचें वाङ्मयहि कां वाईट वाटूं लागतें ! समजा, आपल्याला माहित आहे की अमुक एखादा साहित्यिक दुसऱ्याचे पैसे बुडवतो, एखाद्या उद्योगधंद्यांत शिरला म्हणजे पैसे खातो, हें साधण्यासाठी दूरवर विचार करतो, खोटें बोलतो वगैरे वगैरे. जोंपर्यंत त्याच्या चारित्र्याची ही बाजू आपल्याला माहित नसते तोंपर्यंत त्याच्या साहित्यांतील जीवनाचें विशाल दर्शन, दानतीचा पुरस्कार, सत्यान्वेषण, ध्येयवादित्व, ओज आणि तेज यांनी आपण अतिशय प्रभावित होतों; त्यापासून स्फूर्तिहि घेतों. साहित्य तेंच, आपली अनुभूतिहि खरी पण साहित्यनिर्मात्याची काळीकुट्ट बाजू दिसल्याबरोबर त्याच्या साहित्याचा तात्काळ उबग येतो हेंहि तितकेंच खरें. कारण आपल्या मनाने तात्काळ असा निर्णय दिलेला असतो की त्याचें साहित्य खोटें आहे, नकली आहे, दांभीकपणाचें आहे ! ह्याच दृष्टीने पाहतां साहित्यनिर्माता आणि साहित्य या दोहोंत विसंगति आढळणें हीच नित्याची गोष्ट आहे.

उपदेशकांचा एक वर्ग आहे, तो साहित्यनिर्मात्यांना उपदेश करीत असतो की चारित्र्य चांगल्या तऱ्हेने घडवा, व्यक्तित्वाचा विकास करा म्हणजे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निर्माण कराल तें साहित्य सुंदर होईल! वस्तुतः, ह्या उपदेशाचें खंडन केले तर पुष्कळ सत्प्रकृत माणसांच्या भावना दुखावल्या जातील हें खरें. पण हा उपदेश भ्रमावरच अधिष्ठित आहे असें म्हणणें भाग आहे. डोळे उघडून जरा अवती-भवती बघितलें तर चारित्र्यसंपन्नतेच्या कोटींतली माणसें चांगलें साहित्य तर जाऊं द्याच, साहित्य ह्या संज्ञेला पात्र होणारे लिखाणहि लिहूं शकत नाहीत असे आढळतें व्यक्तित्वाचा विकास झालेल्या माणसांच्या बाबतींतहि तेंच आढळतें असें कां? कारण व्यवहारांतलें व्यक्तिमत्व व साहित्यनिर्मात्याचें व्यक्तिमत्व ह्या दोन गोष्टी भिन्न आहेत.

चारित्र्यसंपन्नतेची व व्यक्तिमत्वाच्या विकासाची महती मला पूर्णतः मान्य आहे, पण ती व्यवहारतः म्हणजे व्यवहारांत चारित्र्यसंपन्न व विकसित व्यक्तिमत्वाच्या माणसाबद्दल मला केव्हांहि अधिक आदर वाटेल. पण साहित्य-निर्मात्याबद्दल मला वेगळ्याच दृष्टिकोनांतून विचार करावासा वाटतो, वर निर्देशिलेल्या साहित्यिकाचेंच उदाहरण आपण विचारादाखल घेऊं या. माझ्या मनःचक्षूपुढे त्याचें साहित्यनिर्मितीसदयीचें एक विशिष्ट व्यक्तिमत्व उभें राहतें. एरव्ही तो, घराची दारें घट्ट लावून घेतलेलीं असावीत व फटींतून किलकिल्या साशंक नजरेने जगाकडे बघावें अशा वृत्तीने वावरत असेल, मोकळेपणाने हंसता देखील येऊं नये इतकें दडपण मनावर लादून वावरत असेल पण साहित्यनिर्मितीसमयीं त्याच्या मनाचीं कवाडें पूर्णपणे उघडतात. त्याची दृष्टि उजाळलेलीच असते. त्याच्या मनावरचें सगळें दडपण नाहीसें झालेलें असतें. त्याचें विमुक्त मन कोणत्याहि असत्याला जखडून घ्यावयाला तयार नसतें. तो खरोखरच सत्याकडे झेप घेत असतो. तो सत्याचें उघड्या डोळ्याने दर्शन घेत असतो व व एका धुंदींत आपला साक्षात्कार शद्बांत ग्रथित करीत असतो. व्यवहारांत अन्य जनांच्या दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या स्वतःच्या व्यक्तिमत्वाशी मेळ राखण्याचा विचार त्याच्या मनाला त्या अवस्थेंत शिवणेंच शक्य नाही. या अवस्थेप्रत पोहचलेला साहित्यनिर्माता सत्याच्या खरोखरच इतका जवळ पोहचलेला असतो की त्या क्षणीं त्याचें व्यक्तिमत्व कोणत्याहि संतमहंताच्या व्यक्तिमत्वाच्याहि वरच्या पातळीवर पोहचलेलें असतें; मग तो व्यवहारी जीवनांत अगदी नादान असला तरी! कारण हें व्यक्तिमत्व खोटें किंवा नकली तर नसतेंच नसतें; तें अधिक सत्यार्थपूर्ण असतें. तें अधिक सत्यार्थपूर्ण आहे. ह्याची स्वतः साहित्य निर्मात्याला इतकी स्पष्ट जाणीव असते की तो बाह्य जीवनाबद्दल खुशाल उदासीन होतो, त्यांत सत्यापलायाचा अवलंबन करतो, स्वतःची प्रतारणाहि करतो पण ह्या व्यक्ति-मत्वाने जगण्यांत मात्र सर्वत्र मानतो.

व्यवहारी जीवनांत चारित्र्यसंपन्न, प्रभावशाली व व्यक्तित्वसंपन्न व्हावयास जशी मोठी तपस्या लागते तशीच त्या अवस्थेप्रत पोहचण्यासाठी साहित्य निर्मात्यालाहि लागत असते. अहोरात्र चिंतन करून, नाना कल्पनाविश्वांची सतत उभारणी करून व त्यांची सत्यान्वेषण बुद्धीने न्याहाळणी करीत, भावना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पिंजून पिंजून व शुद्ध तेवढें काढून घेत तो तें व्यक्तिमत्त्व घडवितो. आंतरिक सृष्टि भव्य आणि भास्वत करण्यासाठी त्याच्या सर्व आंतरिक शक्ति सतत राबत असतात. या तपस्येनंतर त्याला सत्याप्रत झेप घेणें साधतें व थोर आणि प्रभावी साहित्य निर्माण करता येतें. थोडक्यांत म्हणजे साहित्यांत विशाळ जीवनाचें, मानव्यतेचें, विश्वरतेचें आणि नियतीचें भव्य आणि भास्वर दर्शन घडत असेल व त्या दर्शनानें मन प्रभावित होऊन जात असेल तर निश्चित समजावें की त्याच्या बुडाशी सत्यार्थपूर्णतेने अधिक मोठें असे साहित्य निर्मात्याचें व्यक्तिमत्व आहे. तें व्यक्तिमत्वच साहित्य निर्मात्याचें खरें व्यक्तिमत्व. व्यवहारांत निदर्शनास आलेलें व्यक्तिमत्व म्हणजे सम्राटाला रंगभूमीवर प्राप्त झालेली कर्मदारिद्र्याची केविलवाणी भूमिका — आणि तीहि विशिष्ट प्रकारच्या अपुऱ्या सामर्थ्यामुळे अधिक केविलवाणी झालेली! अर्थात् ही भूमिका वठवावयास लागणारें विशिष्ट सामर्थ्यहि त्याने संपादन केलें तर दुधांत साखर पडली! पण तें सामर्थ्य नाही म्हणून एका अधिक सत्यार्थपर व्यक्तिमत्वाला बाध येत नाही.

व्यक्ति म्हणून आपण जी कल्पना करीत असतो तीच सत्यार्थपूर्ण आहे की साहित्य निर्माता म्हणून दुसरें एखादें व्यक्तिमत्त्व अधिक सत्यार्थपूर्ण आहे या प्रश्नाला मी आपल्या परीनें शोधून काढलेलें उत्तर असें आहे. साहित्यिक आणि त्याचें साहित्य ह्यांत मेळ नाही असें म्हणणेंच निरर्थक आहे. साहित्य निर्मितीच्या बुडाशी असलेलें व्यक्तिमत्व व्यवहारी जीवनांतहि उतरल्याचा प्रत्यय पुष्कळदा साहित्यिकांच्या बाबतीत येतो. इतर त्या व्यक्तिमत्वाचा कोणता भाग व्यवहारांतील आभासमय व्यक्तिमत्वांत प्रकटला हें संशोधिण्याचा उपक्रम खुशाल करावा. व्यवहारी जीवनाचा तपशील गोळा करावयाचा व तो साहित्यांत कुठे कुठे उतरला हें संशोधिण्याचा आटापिटा करावयाचा असें केलें तर व्यक्ति आणि वाङ्मय यांत मेळ नाही असलें विचित्र अनुमान काढण्याचा प्रसंग आल्यावाचून राहणार नाही. जे व्यवहारी जीवनाशी मेळ राखीत लिखाण करतात ते खरे साहित्यिकच नव्हत. असला मेळ राखून लिहिलेलें लिखाण मुळीं साहित्यच नव्हे. तो स्वतःचें प्रदर्शन करण्याचा प्रकार झाला; क्षुद्रत्वाचें अवडंबर करूं पाहण्याची रीत झाली. आपण सगळे भाऊभाऊ आहोंत, कुणी स्पृश्य नाही, कोणी अस्पृश्य नाही, सर्वांभूतीं प्रेम करावें, सत्य आचरावें, अहिंसा आचरावी वगैरे सूत्रें व्यवहारी जीवनाचीं आहेत, तीं सुभाषितवजा करून लिखाण सजविण्याचा आचार्यपंथी लेखनप्रकार आज बराच रूढ आहे. पण हें चैत्रगौरीची आरास करण्यांपैकीच आहे. व्यवहारी जीवन नमुनेदार करून तेंच मोजून मापून लिखाणांत घालण्याने लिखाण प्रामाणिक होतें असें कल्पिणें. म्हणजे शुद्ध भ्रम आहे. व्यवहारी जीवन कितीहि आदर्श कोटीप्रत नेलें तरी साहित्यनिर्मात्याचें तें सत्यार्थपूर्ण व्यक्तिमत्व त्याहून कितीतरी वर असल्याचें दिसून येईल. व्यवहारी जीवन आदर्श करूं पाहणें ही गोष्ट स्वतंत्र आहे आणि साहित्यनिर्मात्याच्या कोटीपर्यंत पोहचणें ही प्रक्रिया स्वतंत्र आहे. ह्या सत्याचा टॉलस्टॉयला बरोबर साक्षात्कार झालेला होता. एकदा त्याने अशा अर्थाचे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उद्गार काढले होते की 'सत्य तर तें साहित्यच आहे. माझें व्यवहारांतील जीवन त्या सत्याशी जुळत नसेल तर सत्य व्यवहारी जीवनांत उतरविण्याच्या कामीं माझें सामर्थ्य अपुरें पडतें आहे असें समजा.'

तेव्हां, मी व्यवहारतः जसा आहे त्याच्याशी माझें साहित्य जुळतें मिळतें किंवा कसें हा प्रश्न नाही. तत्पूर्वी मी लिहितों तें साहित्य तरी आहे काय, मी साहित्यिक तरी आहे काय हे वादग्रस्त प्रश्न सुटावयाचे आहेत. खरा प्रश्न असा आहे की साहित्य ह्या उपलब्ध सामग्रीवरून साहित्य निर्मात्याच्या त्या सत्यार्थपर व्यक्तिमत्वाचा आपण कितपत छडा लावूं शकतो ? हा छडा लावण्याचें साधलें तर एक नवें साहित्य-साहित्यिक-विश्लेषण शास्त्रच उदयाला येईल. तें उदयाला येणें अगत्याचें आहे. साहित्य-निर्मात्याची आंतरिक सृष्टि कशी उत्क्रांत होत असते, तिच्या साकल्याने साहित्य-निर्मात्याचें तें सत्यार्थपर व्यक्तिमत्व कसें सज्ज व सुनियंत्रित बनतें, त्या सृष्टीचे निसर्ग नियम कोणते, तें व्यक्तिमत्व प्रकर्षाला केव्हां येतें, कां येतें, कसें येतें !—मला वाटतें साहित्य-निर्मात्यापुढील यक्ष प्रश्न हेच आहेत. हे प्रश्न सुटले तर त्याचा निर्मितिकार्यावर कितपत परिणाम होईल तें सांगता येत नाही, पण साहित्यिक आणि साहित्य यांचें यथार्थ मूल्य-मापन करण्याची दृष्टि मात्र टीकाकारांना खचित लाभेल !

आमची नवीन प्रकाशनें

समाज शिक्षणाकरितां ::

(१) चांदणी. (२) कौंडिण्यपूर व सालबर्डीची यात्रा. (३) आमचे सण व उत्सव. (४) शिक्षकाचा मित्र. (५) भ्रमरगुंफा.

:: हायस्कूल्स, कॉलेजकरितां व इतर

(१) सुमन संचय बोध. (२) आग्र्याहून सुटका नोट्स, ले. प्र. ना. खोडे, एम्. ए. एल. एल. बी. (३) शरीर-विज्ञान व आरोग्यशास्त्र यांतील महत्वाची प्रश्नोत्तरें, ले. डॉ. गो. वि. काणे, एल. एम. पी. (४) विक्रीकला आणि विज्ञापन, ले. प्रा. पी. जे. पटवर्धन, [कॉमर्सच्या विद्यार्थ्यांकरितां]. (५) जनावरांचे रोग व त्यावरील उपाययोजना, ले. डॉ. ग. त्र्यं. गद्रे. (६) वृत्तालंकार आणि व्युत्पत्तीदीपिका [नवीन सुधारलेली आवृत्ति] ले. प्र. गो. निजसुरे, M.A.B.T.T.D. (London) [हायस्कूलकरितां].

प्रकाशक :- **ठाकूर आणि कंपनी लिमिटेड.**

अमरावती : आकोला नागपूर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

माझे उत्कृष्ट चित्र !

✳

लहानपणीचा चित्रकार मी   उलट्या सुलट्या कागदावरती
त्यांतचि तल्लिन असें नेहमी   विद्रुप चित्रे माझि रंगती
वाटे पुष्कळ होईन नामी   निघति मर्कटें जागि गणपती
मोठेपणिही कला अग्रणी   परि निश्चय पक्का कमरे भवती

पिपीलिकेच्या सूक्ष्म पावली   कागद, शाई आणि कुंचला
प्रगती केली ऊन सावली   पुढला टप्पा हात मातिला
हिंमत धरली होइन वाली   फ्लस्टरवरिही हात फिरविला
चित्रकलेच्या श्रेष्ठ बंगली   परिप्राण कलेचा दूर राहिला

श्रेष्ठ कलेचे गमक कोणते   प्रतिभा माझी अर्धांगी जणु
चैतन्याचि चुणुक दावितें   चित्रे अलब्बत अर्भकें गणु
म्हणुनी माझी सर्व चित्रितें   परंतु साप्रत ह्या उलटे म्हणु
ह्या चित्रा पासंगा पुरते   कसे पहाते लिहितों सानु

अर्धांगीच्या सहकार्याने   परंतु हें मी काय बोललो
चित्र निर्मिलें कवतूकाने   ईशाचा अपराधी झालो
अर्भक म्हणजे श्रेष्ट कलेने   कर्तृत्वाने अहंकारलो
आकंठचि भरलेले सुधेने   माझ्याच खांद्यावरि मी चढलो

कोण कोठला चित्रकार मी ?   चित्राने काही चित्र बनविले !
खरोखरीचे चित्र एक मी   भुकेस भुकचि कोणि खादले !
मला बनविले आहे ज्यानी   ब्रशामुळे जरि चित्र रंगले
त्यांच्या चरणी शिर नमवी मी   तरिपण त्याला कुणी लाभले

अर्धांगीची माती आणि   आम्ही बनलो रंग कुंचला
माझे पाणी त्यांत मिळोनी   कागद आणि पाणि मातिला
त्या ईशाने श्रेष्ठ कलेने   परंतु त्यांतचि भूषणमाला
चित्र बनविले कल्पकतेने   सात्विक मानवतेच्या मनाला

—त्र्यंबक महादेव गोगटे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

*प्रेरणा

हांसता फुलानों! मजेंत तुम्ही कां रे?
लचकता वेलिनों! कां तर हर्षोन्मादें?
सौगंधे होसी धुंद केतकी! कां तूं?
कां रूपगर्विते, लाघव दाविशि मारे?
पाखरा, कशाला नेत्रोत्सव या लीला?
निर्झरा, नाचसी कां तूं रुमझुम् ऐसा?
अन् चंद्रा कां तूं कोमल रौप्यकरांनी—
आजि सौख्य-सागरी बुडविसी वसुधेला?

× × ×

पुष्पानों! जालच क्षणांत कोमेजून
मातींत वेलिनों! तुम्हीही मिसळाल
केतकी तुलाही नागफणा डंखील
तोडले तुझेही जातिल विहगा! पाख
संगीत निर्झरा! मूकच तव होईल
लागेल तुला बघ चंद्रा ग्रहणि खग्रास
हा हिंसक बसला टपून काळ-व्याध
ब्रम्हांडावरती पसरून अपुलें जाल

ते जहरी जालिम शराग्र त्याचे तीव्र
जणु युद्धें भीषण, भयाण वा दुष्काळ—

× × ×

तो जगांत पसरो सर्वच हाहा:कार
मानव्य-विनोदन हाच आमचा धर्म
सौंदर्य-सत्य तें मृत्यूवर करी मात
अन् संकटकाळीं धैर्य चढते धार!!

—नारायण नागोराव हूड
बी. ए., एल् एल. बी.

---

*'निराभास' या आगामी काव्य संग्रहांतून.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ वार्ता

लोकनायक डॉ. अणे यांची भेट

ता. १ जानेवारी १९५१ रोजी दुपारी १॥ वाजतां बिहारचे राज्यपाल लोकनायक नामदार डॉ. माधव श्रीहरी अणे यांनी संकल्पित विदर्भ साहित्य मंदिराच्या उत्तर अंबाझिरी—वर्धा रस्त्यांच्या सांध्यावर असलेल्या भगिनिमंडळा-शेजारील प्रशस्तजागेला भेट दिली. नामदार डॉ. अणे यांच्या स्वागतार्थ छोटा शामियाना उभारून या जागेची सुबक सजावट करण्यांत आली होती. याप्रसंगी नागपुरांतील सर्व पक्षांचे निमंत्रित स्त्री-पुरुष नागरीक हजर होते.

लोकनायकांचें स्वागत

ना. डॉ. अणे हे, संघाच्या मंदिरसमितीचे अध्यक्ष ना. अण्णासाहेब मंगळमूर्ति यांच्यासह, विदर्भ साहित्य संघाच्या जागेच्या प्रवेशस्थानीं येतांच संघाध्यक्ष श्री. माडखोलकर, उपाध्यक्ष श्री. बाबासाहेब देशपांडे, कार्यवाह श्री. रा. पु. सगदेव आणि मंदिरसमितीचे कार्यवाह श्री. प. श्री. पटवर्धन यांनी त्यांचें स्वागत केलें.

नंतर नझूल ऑफिसर श्री. तोडकर आणि सर्व्हेअर श्री. कुळकर्णी यांनीं संघाला मध्यप्रदेश सरकारनें दिलेली सुमारें सवा एकर जागा त्यांना दाखविली. ती पाहून ना. डॉ. अणे यांनीं समाधान व्यक्त केले. नंतर ते शामियान्यांत येऊन व्यासपीठावर स्थानापन्न झाल्यावर संघाचे उपाध्यक्ष श्री. बाबासाहेब देशपांडे यांनी स्वागतपर भाषण केलें.

मंदिराची तीन लक्ष रुपयांची योजना

श्री. बाबासाहेब आपल्या भाषणांत म्हणाले, "आज विदर्भ साहित्यमंदिराच्या जागेवर लोकनायक बापूजी अणे यांचें स्वागत करतांना आम्हांला विशेष आनंद होत आहे. आपल्या या द्विभाषी राज्यांत मराठी भाषेची स्थिति आज कोणत्या प्रकारची आहे, हे आपणां सर्वांना माहितच आहे. मध्यप्रदेशांतील आठ मराठी जिल्हे देहि हिंदीच आहेत, असेसुद्धां पुढेंमागें भासविले जाईल! म्हणून मध्यप्रदेशांतील मराठी भाषा जगविण्यासाठी आणि मराठी वाङ्मयाची परंपरा कायम ठेवण्यासाठीं या राजधानीच्या शहरांत मराठी भाषेचें प्रबळ केंद्र निर्माण करणें अवश्य झालें आहे. त्या दृष्टीनेच आम्ही विदर्भ साहित्यमंदिराची योजना हाती घेतली आहे. ही योजना पूर्ण करण्यासाठी सुमारे तीन लक्ष रुपये लागतील. मध्यप्रदेशांचे शिक्षणमंत्री ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र आणि इतरहि मंत्री यांनीं मोठ्या कळकळीनें ही प्रशस्त जागा संघाला दिली आहे. पण, जागा मिळाली असली, तरी तिच्यावर मंदिर उभारणें, हे काम मोठें खर्चाचें आहे. आम्ही मराठीभाषी लोक हे आधीच गरीब! त्यांतून लक्ष्मी आणि सरस्वती यांचें वैरहि सुप्रसिद्धच आहे. तथापि, मराठी जनतेच्या घराघरांतून एकेक रुपया काढून

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या जागेवर मराठी भाषेचें मंदिर उभारण्याचा आमचा निर्धार आहे, लोकनायक अणे हे विदर्भ साहित्य संघाचे आश्रयदाते आणि पुरस्कर्ते आहेत. त्यांच्यासारख्या थोर नेत्याचा आशीर्वाद या कार्याला मिळावा, अशी आमची इच्छा आहे.

मराठी भाषेसाठी हक्काची जागा

नंतर श्री. माडखोलकर यांनी लोकनायकांना हार घातल्यावर उत्तरादाखल बोलतांना ना. डॉ. अणे म्हणाले, "मध्यप्रदेश ती ८ मराठी भाषा आणि वाङ्मय यांच्या कार्याला आणि प्रगतीला स्थैर्य यावे म्हणून विदर्भ साहित्यमंदिर बांधण्याचा जो हा उपक्रम आपण आरंभिला आहे, त्याबद्दल मला समाधान वाटते. आपण मराठी लोक येथीलच राहणार. पण आपल्या भाषेची आज कशी अडचणीची परिस्थिती आहे, हें आपण जाणताच. आपल्या मराठी भाषेला या आपल्याच भूमींत स्वत:चे आसन घालण्यासाठी आजपर्यंत हक्काची जागा नव्हती. ती येथील मंत्रिमंडळाच्या औदार्यानें मिळाली, ही आनंदाची गोष्ट होय. आपल्या मंदिरासाठी जागा मिळण्याचा सुयोग आला, हासुद्धा मी मराठी भाषेविषयींच्या आपल्या अभिमानाचा आणि प्रेमाचाच प्रभाव समजतो; व मला अशी खात्री आहे कीं, श्री. माडखोलकर आणि श्री. देशपांडे यांच्यासारख्या कार्यकर्त्यांच्या प्रयत्नाने येथे लौकरच विदर्भ साहित्यमंदिर उभारलें जाईल. मला स्वत:ला या कार्यासाठी जें कांहीं करणें शक्य होईल तें मी अवश्य करीन. पण, आपणा सर्वांच्या संघटित प्रयत्नानेंच हें कार्य तडीला जावयाचें आहे."

शेवटी 'युगवाणी'चे संपादक प्रो. वामनराव चोरघडे यांनी बापूजींचे आणि उपस्थित मंडळीचे आभार मानले; व शेतकी खात्याचे श्री. शामलाल तिवारी, श्री. मेलग आणि श्री. देशमुख, एम्प्रेस मिल्सचे श्री. भूता आणि श्री. अण्णेगिरी व को-ऑपरेटिव्ह बँकेचे श्री. देव यांनी केलेल्या मदतीचाहि उल्लेख केला. पानसुपारी होऊन हा समारंभ संपला.

कार्यकारी मंडळाची सभा

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा ता. २१ जानेवारी १९५१ रोजी दुपारी ३॥ वाजतां श्री. माडखोलकर यांचे अध्यक्षते खाली नागपूर येथे भरली होती. सभेला न्या. मू. के. तु. मंगळमूर्ती, डॉ. द. खु. देशपांडे, श्री. पु. य. देशपांडे, प्रा. वि. भि. कोलते, प्रा. डॉ. मा.गो. देशमुख, श्री. द. रा. गोमकाळे, श्री. प्र. ना. खोडे, प्रा. भ. श्री. पंडित, श्री. ए. श्री. पटवर्धन, प्रा. वा. कृ. चोरघडे आणि श्री. रा. पु. सगदेव हे सदस्य हाजर होते. सभेत पुढील कामकाज झालें.—

(१) वि. सा. संघाचे तेरावें संमेलन अकोला येथे फेब्रुवारी ऐवजी एप्रिल मधे भरविण्यासंबंधी अकोला येथील स्वागत मंडळाने जी अनुमती मागितली तिला मान्यता.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(२) म. सा. परिषदेने महाराष्ट्रांतील सर्व साहित्य संस्थांची जी सभा सहकार्याची भूमिका उत्पन्न करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी बोलाविली आहे तिला परिषदेच्या विनंतीनुसार प्रा. डॉ. वि. भि. कोलते यांना संघातर्फे प्रतिनिधी म्हणून पाठविण्यांत यावे.

(३) वि. सा. मंदिराच्या उभारणीला प्रत्येक मराठी व्यक्तीला कमीत-कमी निदान एक रुपयातरी देऊन हातभार लावता यावा म्हणून एकरुपयाची तिकीटे अध्यक्षांच्या सहीने काढण्यांत यावीत.

(४) गडकरी स्मारक समितीच्या विनंतीनुसार गडकरी स्मारक दिनाच्या खर्चासाठी समितीला तीस रुपये देण्यास संमति.

मध्यप्रदेश राजभाषा अधिनियमांत दुरुस्ती हवी.

(५) " मध्यप्रदेश सरकारनें ' मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम १९५० ' (१९५० चा २४ वा कायदा) या नांवाचा कायदा नुकताच मंजूर करून इंग्रजीच्या जागीं एक राजभाषा म्हणून मराठीला जी मान्यता दिली आहे. तिच्या बद्दल कार्यकारी मंडळाची ही सभा मध्यप्रदेश सरकारचें आभारपूर्वक अभिनंदन करते. त्याबरोबरच या सभेची सरकारला अशी विनंती आहे कीं, वरील अधि-नियमाच्या ४ थ्या कलमांत हिंदी भाषेला, त्या कलमांत निर्देशिलेल्या बाबतींत जो दर्जा देण्यांत आलेला आहे. तोच दर्जा मराठी भाषेलाहि प्राप्त होईल अशी दुरुस्ती ४ थ्या कलमांत करण्यांत यावी. "

वरील ठरावाचे उद्दिष्ट आणि आवश्यकता हीं मध्यप्रदेशाचे भाषामंत्रि आणि शिक्षणमंत्रि ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांना विशद करून सांगण्यासाठी त्यांच्याकडे शिष्टमंडळ नेण्याचा अधिकार हीं सभा संघाच्या अध्यक्षांना देत आहे.

वर्गणी सरचिटणीसाकडेच पाठवावी.

वि. सा. संघाच्या सभासदत्वाची वर्गणी कोणीहि वसूल केली तरी ती सर्व ताबडतोब सरचिटणीसाकडेच जमा करण्यांत यावी; व सरचिटणीसांनी ती वर्गणी कोषाध्यक्षाकडे जमा करावी. युगवाणीसाठीं अथवा इतर कोणत्याहि संघांच्या कार्यासाठी खर्च करावयाचा झाल्यास त्याचें रीतसर प्रमाणपत्र (Voucher) सरचिटणीसाकडे देण्यांत यावे; व त्यांच्याकडून रकम घेण्यांत यावी. सभासदत्वाची किंवा युगवाणी ची वर्गणी वसूल करणारानीं संघाच्या कोणत्याही कार्यासाठी ती परस्पर खर्च करूं नये. "

सूचना—सभासदत्वाची वर्गणी किंवा इतर व्यवहार यासाठीं पुढील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा:—

श्री. सरचिटणीस, वि. सा. संघ, प्रभानिवास
जेलरोड, नागपूर, नं. १

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचा निकाल

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीबद्दलची मतमोजणी ता. २४-१-५१ रोजीं रात्रीं ९ वा. पूर्ण झाली. मतमोजणीचे अधिकारी श्रीमंत राजे प्रतापसिंहराव भोसले, एम्. एल. ए. आणि ॲडव्होकेट श्री. भा. द. कठाळे हे होते. वि. सा. संघाचे एकंदर मतदार ५५२ आहेत. त्यांपैकीं २८७ मतदारांकडून मतपत्रिका आल्या त्यांपैकीं १० मतपत्रिका अयोग्य रीतीनें भरलेल्या म्हणून रद्द ठरल्या उरलेल्या २७७ मतपत्रिकांनुसार झालेल्या निवडणुकीचा निर्णय पुढें दिला आहे :—

अध्यक्ष

प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे

कार्यकारी मंडळाचे सदस्य

(१) न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति, (२) श्री. पु. य. देशपांडे, (३) श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, (४) डॉ. य. खु. देशपांडे, (५) डॉ. वि. भि. कोलते, (६) श्री. ह. ना. नेने, (७) प्रा. वा. कृ. चोरघडे, (८) श्री. रा. पु. सगदेव, (९) श्री. प्र. ना. खोडे, (१०) श्री. द. रा. गोमकाळे, (११) श्री. बु. ना. काटकर (१२) श्री. ना. ग. डबीर, (१३) श्री. भी. गो. देशपांडे आणि (१४) श्री. ना. क. तांबी.

आभार

मतमोजणीच्या कामीं श्रीमंत राजे प्रतापसिंहराव भोसले आणि ॲड्. कठाळे उभयतांनीं दोन दिवस जे परिश्रम घेतले, त्याबद्दल वि. सा. संघ त्यांचा ऋणी आहे.

प्रभानिवास, जेल रोड, नागपूर नं १. } रा. पु. सगदेव, चिटणीस,
ता. २५-१-१९५१ } वि. सा. संघ

गडकरी स्मृतिदिन

ता. २८ जानेवारी १९५१ रोजी सकाळी ९ वाजतां वि. सा. संघाच्या गडकरी स्मारक समितीतर्फे गडकरी स्मृतिदिन श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यांत आला. सभेचे कामकाज संघाच्या नव्या वर्षाच्या अध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी चालविले. प्रथम कवि आणि नाटककार यांच्या वतीने श्री. आ. रा. देशपांडे, प्रा. म. श्री. पंडित, श्री. ना. रा. शेंडे, श्री. ल. ना. पडोळे, प्रो. श्री. भा. वर्णेकर, श्री. वासुदेवराव भोळे, श्री. पु. ना. भावे, डॉ. कोलते आणि श्री. वसंतराव वरखेडकर यांनीं गडकऱ्यांच्या चित्राला हार घातले. त्याच प्रमाणे नागपूर मराठी साहित्य सभा, महाराष्ट्र विद्यालय सोसायटी, सी. के. पी. एज्युकेशन सोसायटी, राजाराम वाचनालय, महाराष्ट्र साहित्य परिषद इत्यादि संस्थानी चित्राला हार घातले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नंतर गडकरी स्मारक समितीचे आमंत्रक श्री. वरखेडकर यांनी समितीचा अहवाल थोडक्यांत निवेदन करून समितीमार्फत जमा झालेल्या गडकरी स्मारक निधीचा रु. १०८२–१२–० चा चेक संघाध्यक्ष सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांना सादर केला.

त्यानंतर प्रो. डॉ. कोलते यांनी पुढील ठराव मांडला.

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध नाटककार, कवि आणि विनोदी लेखक कै. राम गणेश गडकरी यांचे निधन सावनेर येथे ज्या घरात झाले ते घर महाराष्ट्रियांच्या स्फूर्तीचे अक्षय्य निधान होय. अखिल महाराष्ट्रांत कै. गडकरी हे एकच असे साहित्यिक आहेत की ज्यांचा स्मृतिदिन अखंडपणे साजरा होत असतो. यावरून मराठी भाषेच्या सेवकात गडकऱ्यांच्या विषयी केवढा गाढ आदरभाव आहे तो दिसून येईल. यावरून गडकऱ्यांचे निधनस्थल ही या सर्वांची अत्यंत अभिमानास्पद अशी वंदनीय भूमि होय हे लक्षांत येईल. किंबहुना ती महाराष्ट्राची राष्ट्रीय ठेव आहे. त्या ठिकाणी गडकऱ्यांचे कायमचे स्मारक उभे करावे अशी अखिल महाराष्ट्राची कधीपासूनची उत्कट इच्छा आहे. पण ती अद्याप पूर्ण होऊ शकली नाही. या जागेविषयी मराठी भाषेच्या सेवकांच्या भावना लक्षात घेऊन मध्यप्रदेश सरकारने ती जागा विदर्भ-साहित्य संघाला योग्य किमतीच्या मोबदल्यांत अथवा इतर रीतीने मिळवून द्यावी आणि गडकऱ्यांचे स्मारक उभारण्याला सर्व प्रकारे मदत करावी अशी आमची मध्यप्रदेश सरकारला अत्यंत नम्र विनंती आहे.

या ठरावाला श्री. वरखेडकर यांनी अनुमोदन दिल्यावर तो मंजूर झाला. त्यानंतर श्री. आ. रा. देशपांडे आणि श्री. पु. भा. भावे यांची गडकरी वाङ्मयावर भाषणें झाली. श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी सुमारे तासभर सुंदर भाषण करून समारोप केला. वि. सा. संघाचे चिटणीस श्री. रा. पु. सगदेव यांनी आभार मानल्यावर वंदेमातरम् होऊन हा कार्यक्रम संपला.

वि. सा. संघाच्या सभासदांस विनंति

या महिन्यांत सभासदांकडून मनिऑर्डरीनें नागपुर कचेरीकडे पैसे येत आहेत. त्यांतील कुपनावर कित्येक वेळेला गांवाचे नांव नसते; तर कित्येक वेळेस सही नसते; तर कित्येक वेळेस आपण कशाकरितां पैसे पाठविले याचा उल्लेख नसतो. तरी सर्व सदस्यांस नम्र विनंती आहे कीं, चालू सालची वर्गणी संघांतील कार्याला सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने सर्वांनी एकाच ठिकाणी म्हणजे ती श्री. रा. पु. सगदेव, चिटणीस, वि. सा. संघ, प्रभानिवास, जेलरोड, नागपूर नं. १. याच पत्यावर पाठवावी. इतर ठिकाणी ती पाठविल्यास त्या पाठविणाऱ्या सभासदाचा विचार केला जाणार नाहीं. तसेच ती पाठवितांना कुपनवर संपूर्ण पत्ता व माहिती द्यावी.

बऱ्याच सभासदांकडून डिसेंबर १९५० चा अंक न आल्याची तक्रार आमच्याकडे आली. परंतु नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांचा जोडअंक हा दिवाळी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अंक म्हणून प्रसिद्ध झाला याचें स्मरण येथें द्यावेसें वाटते. तसेंच जानेवारी १९५१ चा अंक ता. १ ला प्रसिद्ध न होता तो ता. १५ ला प्रसिद्ध झाला. त्यामुळें यापूर्वी तो सभासदांकडें जाऊं शकला नाही. 'युगवाणी'चा फेब्रुवारीचा अंक ज्यांच्याकडून सभासदत्वाची वर्गणी येईल त्यांनाच रवाना करण्यांत येईल. तरी सर्वांनी आपली वर्गणी या महिन्याच्या आंत पाठविण्याची कृपा करावी.

प्रभानिवास, जेलरोड, नागपूर नं. १, ता. १६-१-५१

आपला नम्र,
रा. पु. सगदेव, चिटणीस, वि. सा. संघ

कोशाध्यक्ष श्री. ढवळे यांचें पत्रक

सदस्यांना विनंती

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाने आपल्या ता. २१-१-५१ च्या सभेंत संघाच्या सभासदत्वाची वर्गणी आणि 'युगवाणी'ची वर्गणी यासंबंधी केलेला ठराव वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालाच आहे. या बाबतीत पुढील गोष्टी वि. सा. संघाचे सदस्य झालेल्या किंवा होऊं इच्छिणाऱ्या सज्जनांनीं अवश्य लक्षांत घ्याव्यांत अशी विनंती आहे.

(१) संघाची वर्गणी संघाच्या नागपूर येथील कचेरींत-सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, प्रभानिवास, जेल रोड, नागपूर नं. १-यांच्याकडेच प्रत्यक्ष किंवा मनिऑर्डरने भरून तिची रीतसर पावती घेण्यांत यावी.

(२) संघाचे कार्यकर्ते, पदाधिकारी किंवा प्रचारक यांच्यापैकी कोणाजवळहि वर्गणी दिली किंवा कोणी जर वसूल केली तर त्या वर्गणीची रीतसर पावती त्यांच्याकडून घेण्याची दक्षता सदस्यांनीं ठेवावी. रीतसर पावती नसल्यास वर्गणी-संबंधीची कोणतीही तक्रार संघाचें कार्यालय लक्षांत घेणार नाहीं.

(३) मनीऑर्डरीनें वर्गणी पाठविणाऱ्या सदस्यांनीं आपलें पूर्ण नांव व पत्ता तारखेसह म. ऑ. च्या कुपनवर अवश्य नमूद करावा.

(४) प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यंत जे सदस्य होतील, त्यांची नांवे सामान्यतः 'युगवाणी'च्या पुढील महिन्याच्या ताज्या अंकांत प्रसिद्ध होतील. अंकांत नांव प्रसिद्ध न झाल्यास सदस्याने तावडतोब नागपूर येथील कार्यालयाकडे तक्रार करावी.

(५) सन १९५० सालची पावतीपुस्तकें रद्द करण्यांत आली आहेत. ज्या कार्यकर्त्यांकडे किंवा प्रचारकांकडे पावतीपुस्तकें असतील त्यांनी ती तावडतोब नागपूर येथील कार्यालयाकडे परत करावीत.

हें पत्रक प्रसिद्ध झाल्यानंतर १९५० च्या पावतीपुस्तकाची रसीद ही विचारांत घेतली जाणार नाहीं. नवीन पावतीपुस्तकें कोशाध्यक्षांच्या शिक्क्याचीं आहेत.

पुरूषोत्तम दिवाकर ढवळे
कोशाध्यक्ष
वि. सा. संघ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रदेशाची राजभाषा

ता. ३ नोव्हेंबर १९५० रोजीं मध्यप्रदेश सरकारच्या गॅझेटांत प्रसिद्ध झालेलें राजभाषेसंबंधीच्या कायद्याचें अधिकृत सरकारी मराठी भाषांतर अक्षरशः पुढें दिलें आहे :—

नागपूर, दिनांक १ नोव्हेंबर १९५०

मध्यप्रदेश विधानसभेच्या खालील अधिनियमास प्रांतपतीची अनुमति दिनांक २७ आक्टोबर १९५० ला मिळाल्यावरून तो सर्वांचे माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

मध्यप्रदेश प्रांतपतींच्या आज्ञेवरून,
पं. द्वा. देशमुख
सचिव

मध्यप्रदेश अधिनियम, १९५० चा २४ वा

मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम, १९५०

[प्रांतपतीची अनुमती दिनांक २७ आक्टोबर १९५० ला मिळाली. दिनांक ३ नोव्हेंबर १९५० च्या मध्यप्रदेश सूचनापत्रांत अनुमती प्रथम प्रसिद्ध करण्यांत आली.

मध्यप्रदेश राज्याकरिता राजभाषा जाहीर करण्यासाठी अधिनियम

प्रस्तावना

ज्या अर्थी मध्यप्रदेश राज्याच्या सरकारी कामांसाठी वापरण्याकरितां हिंदी व मराठी या भाषा स्वीकारण्याची तरतूद करणें इष्ट आहे;

त्या अर्थी या अन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे:—

लघु संज्ञा व व्याप्ति

१. (१) या अधिनियमास मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम, १९५०, असें निर्देशावें.

(२) तो संपूर्ण मध्यप्रदेशास लागू आहे.

व्याख्या

२. विषयांत अगर संदर्भांत एतद्विरुद्ध कांहीं नसेल तर या अधिनियमांत "हिंदी" म्हणजे जिची लिपी देवनागरी आहे अशी हिंदी आणि "मराठी" म्हणजे जिची लिपी बालबोध आहे अशी मराठी.

राज्याच्या सरकारी कामांसाठीं राज्यभाषा

३. (१) यापुढे केलेल्या तरतुदींत पात्र राहून हिंदी आणि मराठी या सर्व कामासाठीं ह्या राज्याच्या राजभाषा राहतील.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

(२) अधिसूचनेंत निर्देशिलें असेल त्या कोणत्याहि प्रदेशांत आणि निर्देशिलें असेल त्या तारखेपासून निर्देशित केलें जाईल त्या सरकारी कामाकरितां हिंदी किंवा मराठी अथवा या दोन्ही भाषा वापरल्या जातील, असें अधिसूचनेद्वारें फर्माविण्याचा राज्यसरकारास अधिकार आहे.

विधेयकें वगैरेंत वापरण्याची भाषा

४. (१) पुढील बाबींसाठीं वापरण्याची भाषा ही, राज्यसरकार त्यांपैकीं प्रत्येक बाबतींत अधिसूचनेद्वारें नेमून देईल त्या तारखेस व तेव्हांपासून, हिंदी राहील ;—

(अ) राज्य विधानसभेंत सादर करावयाचीं सर्व विधेयकें व त्यांसाठीं मांडावयाचीं सर्व संशोधनें ;

(ब) राज्य विधानसभेनें संमत केलेले सर्व अधिनियम :

(क) भारत संविधानाच्या अनुच्छेद २१३ अन्वये जारी करावयाचे सर्व अध्यादेश :

(ड) भारत संविधानान्वये किंवा संसदेने अथवा राज्याच्या विधान-मंडळानें केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये राज्य सरकारनें काढलेले सर्व हुकूम, नियम, नियमनें आणि पोटकानू.

× × ×

राष्ट्रपतींची मान्यता मिळावयाची आहे

या कायद्याला अद्याप भारताचे राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांची संमति मिळावयाची आहे. ती मिळाल्यावरच हा कायदा अंमलांत येईल.

राजभाषेसंबंधीच्या कायद्यांत मराठीवर आक्रमण नाहीं.

मूळ हिंदीबरोबर प्रामाणिक मराठी भाषांतर दिलें जाण्याची अपेक्षा

विनोबाजींचा मध्यप्रदेश सरकारचा राजभाषा कायद्यासंबंधी अभिप्राय

प्रादेशिक राजभाषेसंबंधीचा मध्यप्रदेश सरकारचा कायदा झाल्यापासून नागपूर–वऱ्हाडांतील आणि विशेषतः पुणें–मुंबईकडील वृत्तपत्रांतून या कायद्या-बाबत अनेक आक्षेप घेण्यांत आले आहेत. हा वाद लक्षांत घेऊन राजभाषेसंबंधी-च्या ठरावाची प्रत आचार्य विनोबाजी यांच्याकडे पाठवून त्यांना याबाबत मार्गदर्शन करण्याची विनंति श्री. ए. श्री. पटवर्धन यांनी केली. आचार्य विनोबाजींचे त्यांना आलेलें पत्र जसेच्या तसेंच खालीं दिलें आहे. आचार्य विनोबाजींचें हें मार्गदर्शन महाराष्ट्रांत चाललेला हा वाद थांबविण्यास मदत करील अशी अपेक्षा आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परधाम, पवनार
(जि० वर्धा)
ता. ६ जानेवारी १९५१

श्री. पटवर्धन,

प्रादेशिक राजभाषेसंबंधीच्या मध्यप्रदेश सरकारच्या कायद्याबाबत तुमचें पत्र मिळालें. तुम्ही पाठविलेली कायद्याची छापील प्रत वाचून पाहिली. पहिल्या तीन कलमांत मिळून संपूर्ण मध्यप्रदेशासाठीं देवनागरींतील हिंदी आणि बाळबोधींतील मराठी या दोन राजभाषा म्हणून जाहीर केल्या आहेत, चौथ्या कलमांत. ज्यावर कांहीं लोकांचा आक्षेप आला आहे म्हणता, विधान सभेंत मांडावयाचीं बिलें आणि त्यांचीं संशोधनें, विधान सभेनें संमत केलेले अधिनियम आणि विशिष्ट अध्यादेश, तसेंच राज्यसत्तेने काढलेले हुकूम इत्यादि, यांची भाषा हिंदी राहील. असें म्हटले आहे.

मूळ संहिता हिंदी मानली जाईल.

याचा अर्थ मी असा करीत नाही की या सर्वांची मराठी भाषांतरें सोबत जोडली जाणार नाहींत. पण मूळ संहिता हिंदी मानली जाईल. अर्थात् कायद्याच्या अर्थासंबंधी जिथें चर्चा उपस्थित होईल, तिथ, वादप्रसंगी मूळ हिंदी शब्द प्रमाण धरलें जातील, असें मी समजलों आहे.

दोन्ही मूळ असें कसें राहूं शकेल ?

ही माझी समजूत जर बरोबर असेल, तर मला यांत कांहीं वावगें किंवा आक्षेप घेण्यासारखें दिसत नाहीं. एक मूळ आणि दुसरें त्याचें प्रामाणिक भाषांतर असे राहील. दोन्ही मूळ असें कसें राहूं शकेल ? प्रामाणिक भाषांतर म्हटल्यानंतर सर्व सामान्य प्रसंगी मुळाचीच योग्यता त्याला असणार. पण वकिलांनीं जर एखादा बारीक वाद उपस्थित केला, तर तेवढ्यापुरते मूळ हिंदी विचारांत घ्यावे लागेल. यात मराठीवर कांहीं आक्रमण होत असेल, असें मला भासत नाहीं.

लिपीची व्यवस्था कां केली ?

मराठी आणि हिंदीची लिपि वस्तुतः एकच आहे. तथापि दोनचार अक्षरांच्या वळणात जो थोडासा फरक आहे. तेवढ्यासाठीं दोन्हींची लिपी एक न म्हणतां मराठी म्हणजे बाळबोधींतील मराठी आणि हिंदी म्हणजे देवनागरीतली हिंदी अशी व्यवस्था केली आहे. कुणावर आक्रमण होऊं नये, हाच त्यांत उद्देश दिसतो.

लिपीच्या नांवासंबंधानें सहज सांगावयाचे म्हणजे मराठीच्या बाळबोध लिपीलाच देवनागरी म्हणतात आणि हिंदीच्या लिपीला 'नागरी' म्हणतात, अशी माझी समजूत होती. पण हा मुद्दा प्रस्तुत नाही.

विनोबाचे प्रमाण

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संमेलन

स्वागतमंडळाची कार्यकारिणी

विदर्भ साहित्य संमेलनाच्या स्वागत सभासदांची सभा ता. २२-१-५१ रोजीं भरून पुढील पदाधिकारी निवडण्यांत आले.

स्वागताध्यक्ष-मा. ब्रिजलालजी बियाणी. स्वागतोपाध्यक्ष—श्री. वि.रा. ऊर्फ काकासाहेब ओक, अकोला. चिटणीस:—श्री. प्र. ना. खोडे. सहचिटणीस:—सौ. ज्योत्स्ना कर्णिक व श्री. डॉ. कृष्णमूर्ति, कविरत्न. कोषाध्यक्ष-श्री. सुरजमलजी शिंगी.

संमेलनाच्या कार्यासाठी निरनिराळ्या समित्या नियुक्त करणें आवश्यक आहे, असें ठरलें. या समित्यांचे खालीलप्रमाणें आमंत्रक नियुक्त करण्यांत आले असून आपल्या समितीच्या सभासदांची नियुक्ति करण्याचा अधिकार आमंत्रकांना देण्यांत आला. निरनिराळ्या समित्यांचे आमंत्रक हे स्वागत मंडळाच्या कार्यकारिणीचे सभासद आहेत.

(१) निवास समिति—श्री. वैसास वकील. (२) भोजन समिति—श्री. मु. वि. ओक वकील. (३) सभागृह व सजावट समिति—श्री. प्र. गो. कर्णिक वकील व श्री. ब. ना. काटे वकील. (४) प्रसिद्धी समिती-श्री. शांताराम जैन (५) करमणूक समिती-श्री. माटे (६) स्वयंसेवक समिति-श्री. रतनलाल अग्रवाल. (७) निधि समिति—श्री. खुशालभाई मेहता.

कार्यकारी मंडळ २५ जणांचे राहणार असून त्यावरील फक्त १५ जागा वरीलप्रमाणें भरल्या आहेत. पुढें जसजसे आणखी स्वागत सभासद होतील तसतशा आवश्यकतेनुसार कार्यकारी मंडळावरील सभासदांच्या दहा जागा भरण्याचे अधिकार वरील कार्यकारी मंडळास देण्यांत आले.

संमेलन ता. २८ व २९ एप्रिल १९५१ रोजीं भरविण्याचें निश्चित करण्यांत आलें.

विदर्भ साहित्यसंघाच्या घटनेंत सुधारणा करा

राजे प्रतापसिंहराव भोसले आणि ॲड. कठाळे यांच्या सूचना

विदर्भ साहित्यसंघाच्या गेल्या आठवड्यांत झालेल्या निवडणुकीच्या मतमोजणीचे अधिकारी श्रीमंत राजे प्रतापसिंहराव भोसले, एम्. एल. ए., आणि ॲड. भा. द. कठाळे यांनीं संघाच्या घटनेसंबंधी अध्यक्ष श्री. माडखोलकर यांना पाठविलेलें पत्र पुढें दिले आहे:—

निवेदन करणें अवश्य वाटतें

आपण वि. सा. संघाच्या वार्षिक निवडणुकीचे अधिकारी म्हणून आमची जी नेमणूक केली आणि त्याप्रीत्यर्थ आम्हाला संघाची सेवा करण्यास जी संधी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिली, त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोंत. या प्रसंगानें आम्हास आपणासाठी व वि. सा. संघाच्या सर्व सभासदांसाठीं थोडेसें निवेदन करावेसें वाटतें. त्याचा आपण सर्वांनी यथामति व यथायोग्य विचार करावा, ही विनंती.

आपल्या संघाची घटना आम्ही वाचली. तिच्यांतील विशेषत: निवडणुकी-संबंधी जे नियम आहेत, त्याबद्दल आम्ही येथे दोन शब्द लिहिण्याचें ठरविलें आहे. तरी जे आपण अवश्य विचारांत घ्यावे.

घटना नियम २७ हा अत्यंत उपयुक्त, आहे; व त्याबद्दल दुमत होण्याचें कारण दिसत नाही.

कार्यकारी मंडळ तीन वर्षांचें असावें

घटना नियम २८ हा मात्र आपण अवश्य बदलला पाहिजे. कारण सध्याच्या नियमानुसार कार्यकारी मंडळ दर वर्षी निवडले जाते. त्याऐवजी ते दर तीन वर्षांनी निवडले गेल्यास संस्थेच्या कार्याच्या व स्थायीपणाच्या दृष्टीने अत्यंत हितावह होईल. कारण सध्याच्या नियमाप्रमाणे अध्यक्षाला व कार्यकारी मंडळाला काम करण्याच्या दृष्टीने फारच थोडा अवधि मिळतो. निवडणुक झाल्यानंतर पाहिले एक दोन महिने संघाचें काम समजावून घेण्यांत जातात. आणि हिशेब कार्य सुरू होतें न होते, तोंच नवीन निवडणुकीचे दिवस जवळ येतात. त्यामुळें कामाची पूर्तता न होताच कार्यकारी मंडळाला तें अर्थातच सोडावे लागते. नवीन निवडून येणाऱ्या कार्यकारी मंडळाला जुन्याचे कार्य पसंत पडेलच असे नाही. सबब या दृष्टीने एका कार्यकारी मंडळाचें अस्तित्व कमीत कमी तीन वर्षांचें असावें.

वार्षिक निवडणूक आर्थिक दृष्ट्या खर्चाची

दुसरें असें कीं, साहित्यसंस्था म्हटल्या की त्यांच्या आर्थिक अडचणींची कोणाहि सहजच कल्पना येण्यासारखी आहे. या दृष्टीने दर वर्षी केवळ निवडणुकीसाठीं अंदाजे ३०० ते ३५० रुपये खर्च येतो असें आम्हास चिटणीसांकडून कळल्यामुळें, आर्थिक दृष्ट्याहि ही निवडणूक दरवर्षी होणें सोईचें वाटत नाही. शिवाय मिळालेल्या अल्पावधींत काम करणाऱ्या माणसाचा उत्साहभंग होण्याचा फारच संभव आहे. तरी हा नियम संस्थेच्या हिताच्या दृष्टीने अवश्य बदलून घ्यावा.

निवडणूक कशा रीतीनें व्हावी ?

आता घटना नियम २८ ओळ तीन मधील 'तीतील' पासून 'जाईल' पर्यंतच्या ओळी रद्द करून नवीन नियम करावा. या बाबतींत आमची सूचना अशी आहे कीं, निवडणुकीसाठीं ज्या ज्या गृहस्थांना उभे रहावयाचें असेल किंवा ज्यांना इतरांची नावें सुचवावयाची असतील, त्यांनी त्याचे सुचक व अनुमोदक यांच्या सहीनिशी सभासदांची लेखी अनुमती घेऊन ती सरचिटणीसांकडे निवडणु-

कीचे अगोदर योग्य अवधींत पाठवावी. याबद्दल संघाने निवडणुकीसाठी उभे राहणाऱ्या प्रत्येक सभासदाकडून वाटल्यास कमींत कमी पांच रुपये शुल्क म्हणून घ्यावे. ही सूचना करण्यांत आमचा उद्देश एवढाच कीं, संघाला थोडेबहुत खर्चाच्या दृष्टीने सहाय्य व्हावे. अशा रीतीने सूचित झालेल्या सभासदांची यादी, आलेल्या अर्जांची चांचणी करून, नंतर छापून ती सर्व सभासदांकडे निवडणूकीसाठी पाठवावी.

' सर्वच उभे '–ही पद्धति सोईची नाहीं.

याच्या अनुषंगाने जे नियम योग्य वाटतील ते करावे. म्हणजे आजच्या नियमाप्रमाणें निवडणुकीचे वेळीं जो विनाकारण त्रास होतो व व्यर्थ वेळ जातो, तो टळेल. कारण निवडणुकीसाठी सर्वच उभे आहेत असे म्हणण्यांत हशील नाहीं. असे समजा की, प्रत्येकाने स्वतःच स्वतःचें नांव अध्यक्षपदासाठीं सुचविलें, तर त्या वर्षाला अध्यक्ष निवडून येणेंच दुष्कर होईल. अशी परिस्थिति दुर्दैवाने निर्माण झाल्यास तिच्या निराकरणाची तरतूद घटनेंत आम्हाला तरी दिसली नाहीं.

जिल्हानिहाय सभासद घ्या

कार्यकारी मंडळांत जिल्हानिहाय सभासद घेण्याची प्रथा उत्तम आहे. संस्थेच्या प्रगतीच्या दृष्टीने हें योग्यच आहे. मतपत्रिका ज्या त्या जिल्ह्यांतील सभासदांनी आपापल्या जिल्हाधिकाऱ्याकडे ठरलेल्या वेळीं रवाना कराव्यात आणि त्यांनीं नंतर त्या मुख्य कचेरीकडे पाठवाव्यात. म्हणजे यामुळें मुख्य कचेरीशी सर्व शाखासंस्थांचा निकटचा संबंध कायम राहून दिवसेंदिवस तो दृढ होत जाईल आणि संस्थेचें स्थैर्य टिकविण्यास व तिची वाढ होण्यास मदत होईल.

आणखी दोन सूचना

निवडणुकींत दोन व्यक्तींना जर सारखी मतें पडलीं, तर त्यांच्यापैकी कोणास घ्यावे, या संबंधी घटनेंत कांहीं तरतूद नाहीं. तरी निवडून आलेल्या सभासदांनी अशा व्यक्तींचा निकाल लावावा. तसेंच निवडणुकींतील प्रत्येक मतपत्रिकेवर कोणा तरी जबाबदार व्यक्तीची सही असावी.

हिंदीभाषी विभागांतील मराठी संस्थाना प्रतिनिधित्व द्या.

मध्यप्रदेशाच्या हिंदी विभागांतील मराठी संस्कृती व भाषा यांची उपासना करणाऱ्या ज्या ज्या संस्था असतील, त्यांना प्रतिनिधित्व देण्यासंबंधी योजना करावी. मराठीच्या आस्थेचा मध्यप्रदेशातील कोणताहि भाग किंवा जनसमाज उपेक्षित व असंबंधीत ठेवण्यांत येऊं नये. तसेंच प्रातिनिधित्व शक्य तोंवर प्रादेशिक ठेवण्याचा प्रयत्न करावा.

मोजणीला तीन दिवस लागले

संस्थेच्या दृष्टीनें आपण वरील सूचनांचा विचार करावा. तसेंच, आनुषंगिक जे बदल असतील, तेही अवश्य करावे. पावणेतीनशें मतपत्रिकांच्या मोजणीला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
अनुक्रमणिका

तीन दिवस लागेल, यावरून संघाच्या घटनेंत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे असे आम्हाला वाटलें आणि आमच्या समजुतीप्रमाणें आम्ही ह्या सूचना आपणांस केल्या आहेत. त्यांचा योग्य तो विचार व्हावा. सर्व सभासदांच्या माहितीसाठीं वाटल्यास आपण ह्या सूचना वर्तमानपत्रांतून आणि आपल्या संघाच्या 'युगवाणी' मासिकांतूनहि अवश्य प्रसिद्ध कराव्यांत.

नागपूर,
१८-१-५१

प्रतापसिंहराव भोंसले
भा. द. कठाळे

वैदर्भी रीतींवरील चर्चा

ता. १५ मार्चपर्यंत मुदत वाढली

वि. सा. संघाच्या संमेलनाचे तेरावें अधिवेशन अकोला येथे ता. २८, २९ एप्रिल १९५१ रोजीं भरण्याचें ठरले आहे. त्यामुळे या संमेलनांत वैदर्भी रीति आणि एकंदर रीतिशास्त्र यांच्यावरील चर्चेचा जो विभाग ठेवण्यांत आलेला आहे, त्यासाठीं निबंध पाठविण्याची मुदतही ता. १५ मार्च १९५१ पर्यंत वाढविण्यांत येत आहे. या मुदतवाढीचा फायदा घेऊन साहित्याचे अभिज्ञ आणि अभ्यासक वैदर्भी रीति आणि रीतिशास्त्र यांवरील आपले निबंध ता. १५ मार्चपर्यंत खालील पत्त्यावर पाठवितील, अशी आशा आहे.

प्रभानिवास, जेल रोड,
नागपूर, नं. १.
ता. ३१-१-१९५१

रा. पु. सगदेव
चिटणीस,
विदर्भ साहित्य संघ

★

माहे जानेवारी १९५१ मधील परीक्षांचा निकाल

मराठी प्रवेश

वर्ग १ ला—सुरेश तुकाराम देशपांडे, सुधाकर भास्करराव दाणी.

वर्ग २ रा—लक्ष्मीकांत प्रभाकर देशपांडे, वसंत भास्कर पापळकर, हरीहर शंकरराव पापळकर, लीला रामचंद्र आनेगोंदीकर.

वर्ग ३ रा—उषा दत्तात्रय देशपांडे, सूर्यकुमार वन्सीधर घाटोळ.

मराठी प्रारंभ

वर्ग १ ला—सौ. निर्मलाबाई केशवराव निमोणकर.

वर्ग २ रा—दिनकर लक्ष्मणराव जोगळेकर, कृष्णा धोंडुजी कापगते काशीराम शिवाजी पगाळे, चिंधू सदाशिव संग्रामे, पतिराम मन्साराम पुस्तोळे, प्रभाकर दुधरामजी रणदिवे, कु. पुष्पा रामभाऊ गायकवाड, रामकृष्ण आकोजी काशीवार, शालीग्राम

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तेजराम कापगते, सांबा दामाजी मेश्राम, वत्सला पुरुषोत्तम खानापुरकर.

वर्ग ३ रा—सौ. प्रमिलाबाई केशवराव कदम, अरविंद तुकाराम देशपांडे, नरनारायण जोधराज बाजोरीया, शंकरलाल रामरखजी कासर, गंगाराम नागोजी कोकोडे, मार्तंड रामाजी कापगते, रामा जीवन इळपाते, हरी टिकारामजी गोटेफोडे, गोपाळ भिकासा धारस्कर, भिकमचंद रामदेवजी चितलांगे, विजय कृष्णराव दारव्हेकर, शरद्चंद्र मोतीलाल फुलाडी.

साहित्य विनीत

वर्ग २ रा—विठ्ठल नथ्थूसा रत्नपारखी, गणपती लहानु मोहुर्ले, लक्ष्मण सीताराम डोंगे, मनोहर वामन निलावार.

वर्ग ३ रा—बाळकृष्ण रामचंद्र कपाळे, विठ्ठल परशरामजी लोखंडे, मधुकर रामराव काळे, यशवंत जगजीवनराव कदम, रामचंद्र नारायण गाताडे, रामचंद्र सुरजमल जोशी, वसंत एकनाथ चिद्दरवार, भेकदास बालाजी पेन्दाम, लक्ष्मीकांत केशवराव डंख, वसंत नारायण दहिकार, वामन कृष्णाजी गावंडे, शरद्चंद्र भाऊराव गोधने, केशव कृष्णाजी शेंडे, नारायण शिवराम भगत, मारोती उरकुडाजी चाहारे, कु. नलिनी प्रल्हादराव काशीकर, कु. हरिणी गंगाधर विटाळकर, अनंत मारोती लांजेवार, बळीराम बाळाजी बडोले, कु. तारा यशवंतराव येंगल, प्रमिला पंढरीनाथ नंद, अर्जुन सदाशिव साखे, चिंतामण लक्ष्मणराव बावनकर, दिगम्बर गणपतराव जोशी, यशवंत शंकरराव कौशिककर, रामगोपाल किसनलाल पांडे, शंकर फकीरजी सेंगेकर, शांतीलाल मोहनलाल बरालिया, कृष्ण गोपाळ शिंदे, त्र्यंबक मारोतराव पांचवरे, कु. इंदु पुरुषोत्तम खानापूरकर.

साहित्य परिचित

वर्ग २ रा—कु. मालती गजानन जोशी, कु. सिंधू लक्ष्मणराव खोलकुटे, हरिहर गोविंद येगांवकर, नथ्थू रामचंद्र निमजे, सुशीला शांताराम सावंत.

वर्ग ३ रा—नथ्थू महादेवराव निळे, बालाजी रामाजी पुट्टेवार, हरीभाऊ देवाजी घटे, कु. गीता बाजीराव उदामे, कु. नलिनी जोशी,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यमु विश्वनाथराव देशपांडे, कु. लीलावती भालचंद्र बाघ, कु. लीला गंगाधर पैकणे, कु. विमल हरिभाऊ गोखले, कु. सुमन प्रभाकरराव साखरे, भास्कर माधवराव उत्तरवार, माधवराव मारोतीराव चवरे, वामन पुंडलीक भोयर, कु. सुमन नरहर पारनाईक, मधुकर विष्णुपंत पाठक, मालती शेषराव मरदेशपांडे.

साहित्य स्नातक

वर्ग २ रा—कु. मालिनी बळवंत टोंगू, सौ. सुधा गोपाळ डोंगरे, मधुकर सदाशिवराव हुद्दार.

वर्ग ३ रा—इंदु रामचंद्र देशपांडे, कु. नर्मदा विनायक बोरगांवकर, कु. तारा राजेश्वरराव जोशी, कु. दुर्गा रामचंद्र देशपांडे, कु. प्रभावती गणपतराव गुर्जे, यशवंत शेषराव कुळकर्णी.

विदर्भ साहित्य संघाच्या जानेवारी १९५१ मधे झालेल्या सर्व परीक्षांना एकूण १९५ विद्यार्थी बसले. त्यांतून ९७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एकंदर निकालाचे प्रमाण शेकडा ५० आहे. अमरावती, अकोला, आर्वी, चांदा, जबलपूर, दारव्हा, नांदुरा, नागपूर, भंडारा, यवतमाळ, वरुड, वर्धा व माकोली अशी एकूण १३ परीक्षाकेंद्रें होतीं.

प्रभा निवास, जेलरोड,
नागपूर नं. १.
ता. ६-२-१९५१.

वि. भि. कोलते, संचालक
रा. पु. सगदेव, कार्यवाह,
परीक्षा समिति—विदर्भ साहित्य संघ.

या वर्षीच्या जनगणनेंत मराठी भाषिकांना आपली मराठी भाषा नोंदविण्यास विसरूं नये. साक्षरांनी निरक्षरांस तसें प्रयत्नपूर्वक सांगावें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शाळा–कॉलेजांना लागणारें सर्व साहित्य

सर्व प्रकारच्या
खेळांचें
सामान
★
हॉकी
क्रिकेट
फुटबॉल
व्हॉली-बॉल
बास्केट-बॉल
बॅडमिंटन
टेनिस
आणि
इतर
★
आमचे येथे
माफक
आणि
खात्रीचें

★
धूतपापेश्वर
पनवेल
लिमिटेड
यांच्या
आयुर्वेदीय
औषधांचे
वऱ्हाडांतील
एकमेव
वितरक
★
शालेय
ललित
गंभीर
शास्त्रीय
वाङ्मयाचे
प्रकाशक

नकाशे
ग्लोब
शास्त्रीय उपकरणें
आणि
इतर साधनें
तसेंच
मासिक हजेरी
आवक जावक बारनिशी
इतर
सर्व प्रकारचीं रजिस्टर्स
वह्या
स्टेशनरी
शालेय पुस्तकें
वाचनीय पुस्तकें
धार्मिक ग्रंथ
श्री संत तुकडोजी
महाराज
यांची
सर्व पुस्तकें
ठोक व चिल्लर

★ ठाकूर आणि कंपनी लिमिटेड ★

अमरावती ★ नागपूर ★ अकोला

आकर्षक आणि हरतऱ्हेची छपाई

हरिहरेश्वर मुद्रणालय, नागपूर ★ महेश्वर मुद्रणालय, अमरावती

मुद्रक, प्रकाशक : प. वि. बेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ